शेतीक्षेत्राच्या यांत्रिकीकरणामुळे त्या क्षेत्रातील विस्थापित झालेल्या श्रमिकांना औद्योगिक क्षेत्रात रोजगार व उत्पन्न मिळण्यास मदत होणार आहे.

औद्योगिक क्षेत्रात प्रगती झाल्यास त्यामुळे शेतीक्षेत्रात तयार होणाऱ्या कापूस, ताग, ऊस इत्यादी औद्योगिक कच्च्या मालास अधिकाधिक मागणी येऊन त्यामुळे शेतीक्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे.

त्याचप्रमाणे शेतीक्षेत्रात प्रगती झाल्यास व त्या क्षेत्रातील श्रमिकांचे उत्पन्न वाढत गेल्यास, औद्योगिक मालास अधिकाधिक मागणी येऊन त्यामुळे औद्योगिक प्रगतीस हातभार लागणार आहे.

वरील विवेचनावरून असे दिसून येईल की, औद्योगिक क्षेत्र व शेतीक्षेत्र यांमध्ये कोणत्याही प्रकारचा विरोध किंवा वैमनस्य नसून, एका क्षेत्रातील प्रगती, दीर्घकाळाच्या दृष्टीने विचार करता दुसऱ्या क्षेत्राच्या विकासास मदतच करणार आहे. याचाच अर्थ, प्रगत औद्योगिकीकरण म्हणजेच प्रगत शेतीक्षेत्र आणि प्रगत शेतीक्षेत्र म्हणजे प्रगत औद्योगिक क्षेत्र, असे मानणे योग्य होईल.

(6) **स्वावलंबित्व :** औद्योगिकीकरण न झाल्यास हजारो औद्योगिक वस्तूंसाठी भारताला परदेशांवर अवलंबून राहावे लागेल. आवश्यक अशी यंत्रसामग्री व त्यांचे सुटे भाग, औषधे, पेट्रोल व इतर आवश्यक वस्तूंच्या पुरवठ्यासाठी भारताने परदेशांवर अवलंबून राहण्यात आर्थिक त्याचप्रमाणे राजकीय धोके संभवतात. भारताच्या सुदैवाने निरनिराळ्या प्रकारचा औद्योगिक कच्चा माल भारतात विपुल प्रमाणात उपलब्ध असल्याने भारतास आवश्यक वस्तूंच्या बाबतीत देशाच्या औद्योगिकीकरणाद्वारे स्वावलंबी होणे शक्य आहे.

(7) **देशाच्या संरक्षणासाठी :** भारतात जलद गतीने औद्योगिकीकरण घडवून आणणे आणखी एका अत्यंत महत्त्वाच्या कारणामुळे जरुरीचे आहे व ते कारण म्हणजे भारताच्या संरक्षणाचा व देशाचे स्वातंत्र्य टिकविण्याचा प्रश्न है होय.

युद्धसामग्रीच्या निर्मितीसाठी भारताचे औद्योगिकीकरण अत्यंत जरुरीचे आहे. युद्धसामग्रीसाठी परकीय देशांवर अवलंबून राहणे म्हणजे आपले आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य परकीयांकडे कायमचे गहाण ठेवण्यासारखेच आहे.

(8) **सामाजिक आणि नैतिक मूल्यांत बदल :** औद्योगिकीकरणामुळे होणारा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे त्यामुळे भारतात प्रचलित असलेल्या सामाजिक व नैतिक मूल्यांत आवश्यक ते बदल घडून येण्यास मदत होणार आहे.

औद्योगिकीकरणामुळे शिस्त, दीर्घकाळ व एकाग्रतेने काम करण्याची सवय, इतरांशी सहकार्य करून काम करण्याच्या प्रवृत्तीत वाढ, स्पर्धात्मक व विजिगीषू मनोवृत्ती, आत्मविश्वास, शास्त्रीयदृष्ट्या विचार करण्याची प्रवृत्ती, यंत्रे हाताळण्याच्या कौशल्यात वाढ इत्यादी गुणांची वाढ होण्यास मदत होणार आहे; म्हणजेच औद्योगिकीकरणाबरोबरच औद्योगिक संस्कृतीचा भारतात विकास होणार आहे. औद्योगिकीकरणामुळे जे धोके संभवतात ते मूलतः औद्योगिकीकरणाचे धोके नसून, औद्योगिकीकरण नियोजनात्मकदृष्ट्या योग्य प्रकारे न केल्यामुळे उत्पन्न होणारे धोके होत. (उदाहरणार्थ, झोपडपट्टीची वाढ, प्रदूषण इत्यादी)

वरील विवेचनावरून भारतात जलद औद्योगिकीकरणाची आवश्यकता का आहे, हे समजून येईल. सामाजिक, नैतिक, राजकीय आणि आर्थिक कारणांसाठी, रोजगार वाढविण्यासाठी व अधिकाधिक श्रमिकांना वाढते उत्पन्न मिळविण्याच्या दृष्टीने, देशातील नैसर्गिक व मानवी साधनसामग्रीचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन निरनिराळ्या औद्योगिक वस्तूंचे व सेवांचे उत्पादन वाढवून लोकांच्या राहणीमानात वाढ घडवून आणण्याच्या दृष्टीने अर्थव्यवस्थेतील इतर क्षेत्रांमध्ये (उदा., शेतीक्षेत्र, वाहतूक क्षेत्र, ऊर्जाक्षेत्र इत्यादी) प्रगती घडवून आणण्यासाठी, आधुनिक जगात आवश्यक असलेले कौशल्य संपादन करण्यासाठी, देशाच्या संरक्षणासाठी व देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेचा वृद्धिदर वाढवून भारतातील शेकडो वर्षे अस्तित्वात असलेली बेकारी, दारिद्र्य व अज्ञान इत्यादींचे उच्चाटन करण्याच्या दृष्टीने, भारतात जास्तीत जास्त जलद गतीने औद्योगिकीकरण घडवून आणण्याची आवश्यकता आहे.

◆◆◆

जनता सरकारने या तीन वर्गांत समाविष्ट होणाऱ्या लघुउद्योगांच्या विकासासाठी त्यांना उपयोगी पडतील अशी धोरणे आखण्याचे ठरविले.

लघू व कुटीरोद्योगांच्या विकासासाठी जनता सरकारने पुढील उपाययोजना सुचविल्या - (i) पूर्वी ठरविलेल्या 180 वस्तूंऐवजी मे 1978 मध्ये वरील यादीत 807 वस्तूंचा समावेश करण्यात आला व असे ठरविण्यात आले की, या 807 वस्तूंचे उत्पादन फक्त लघुउद्योग क्षेत्रातच केले जावे. (ii) लघुउद्योगांना आवश्यक असलेली निरनिराळ्या तऱ्हेची मदत एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी (म्हणजेच लघुउद्योजकांना इकडून तिकडे पुनःपुन्हा फेऱ्या माराव्या लागू नयेत) म्हणून प्रत्येक जिल्ह्यात 'जिल्हा उद्योग केंद्र' स्थापन करण्याचे ठरविण्यात आले. भारतीय औद्योगिक विकास बँकेत (IDIB) एक स्वतंत्र विभाग उघडण्यात येऊन निरनिराळ्या वित्तीय संस्थांकडून लघुउद्योगांना जी वित्तीय मदत मिळते तिचे एकसूत्रीकरण करण्याचे काम या स्वतंत्र विभागाकडे सोपविण्यात आले. (iii) खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे कार्य वाढविण्याचे ठरविण्यात आले. पॉलिस्टर खादी व नवी खादी यांच्या उत्पादनास प्रोत्साहन देऊन खादी विणकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यास मदत करण्याचे ठरविण्यात आले. त्याचप्रमाणे खादीबरोबर चर्मोद्योग व साबण उद्योगही आयोगाने हाती घ्यावेत अशी शिफारस करण्यात आली. (iv) लघुउद्योग आणि कुटीरोद्योगांच्या बाबतीत योग्य त्या आधुनिक तंत्रांचा वापर करून त्या उद्योगांची उत्पादकता व त्या उद्योगांमधील श्रमिकांचे उत्पन्न वाढवावे असे ठरविण्यात आले.

(2) **मोठ्या उद्योगांचे क्षेत्र आणि कार्य :** मोठ्या उद्योगांचे क्षेत्र व त्यांचे कार्य पुढीलप्रमाणे राहील असे ठरविण्यात आले. सर्वसाधारण जनतेच्या गरजा भागविण्यासाठी ज्या वस्तूंची आवश्यकता आहे त्यांचे उत्पादन करणे आणि वाढविणे, अवजड उद्योग क्षेत्रात उत्पादन करणे व वाढविणे, सोई-सुविधा पुरविणाऱ्या उद्योगांच्या क्षेत्रात कार्य करणे, मोठ्या व लहान उद्योगांना ज्या वस्तूंची आवश्यकता भासते (उदाहरणार्थ, लोखंड व पोलाद, सिमेंट, रसायने, खते व ज्या वस्तू लघुउद्योगांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या नाहीत) अशा वस्तूंचे उत्पादन करणे व ज्या वस्तूंच्या उत्पादनासाठी उच्च प्रतीच्या तंत्रज्ञानाची व यंत्रांची आवश्यकता भासते अशा वस्तूंचे उत्पादन करणे. अशा रीतीने मोठ्या उद्योगांच्या क्षेत्राचे नियमन किंवा नियंत्रण करण्याचे ठरविण्यात आले.

(3) **मोठे उद्योगपती आणि त्यांच्या औद्योगिक साम्राज्याबाबत :** मोठे उद्योगपती आपले औद्योगिक साम्राज्य सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्थांच्या मदतीने वाढवित आहेत. तेव्हा त्यांना अशा वित्तीय संस्थांची मदत बंद करून आपल्या उद्योगातून निर्माण केलेल्या बचतीवरच यापुढे विसंबून राहावे लागेल. सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्था आपली मदत यापुढे लघुउद्योग क्षेत्रालाच देतील. भांडवलप्रधान उद्योगाबाबतही मधल्या पातळीवरील उद्योजकांना अशा वित्तीय संस्था मदत करतील. औद्योगिक साम्राज्यावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने मक्तेदारांविरुद्धच्या कायद्याचा (MRTP Act) वापर अधिक तत्परतेने व परिणामकारक रीतीने करण्यात येईल. मोठ्या उद्योगांवरील किंवा कारखान्यांवरील विशिष्ट घराण्याची मालकी पद्धती कालबाह्य असल्याने अशा उद्योगांच्या व्यवस्थापनाचे अधिकाधिक व्यावसायीकरण (Professionalisation) करण्याचे ठरविण्यात आले.

(4) **सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे वाढते कार्य :** सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची कक्षा वाढविण्यात येऊन अशा उद्योगांनी फक्त मूलभूत व अवजड भांडवली वस्तूंचेच उत्पादन न करता काही महत्त्वाच्या उपभोग्य वस्तूंचेही उत्पादन करावे असे ठरविण्यात आले. अशा उद्योगांनी आपले साहाय्यक-उद्योग (Ancillary Industries) वाढवावे व त्याचप्रमाणे आपणाकडे असलेले तंत्रज्ञान व व्यावसायिक कौशल्य लघुउद्योगांच्या विकासासाठी उपलब्ध करून द्यावे असे ठरविण्यात आले.

(5) **तांत्रिक क्षेत्रातील स्वावलंबनात वाढ :** ज्या उद्योगांमध्ये अत्युच्च पातळीवरचे तंत्रज्ञान आवश्यक आहे व जे भारतात अद्याप विकसित झालेले नाही फक्त अशा तंत्रज्ञानाची आयात करून तिचा वापर करण्यात यावा; पण असे तंत्रज्ञान वार्षिक फी वगैरे देण्याच्या अटीवर न घेता ते संपूर्णपणे विकत घेण्यात यावे व त्यात भारतातील परिस्थितीनुसार बदल किंवा सुधारणा करून ते अत्युच्च पातळीवरील तंत्रज्ञान भारतातील संबंधित उद्योगांमध्ये वापरण्यात यावे असे 1977 च्या औद्योगिक धोरणाने ठरविले.

(6) **परदेशी औद्योगिक कंपन्यांशी सहकार्य :** ज्या उद्योगांमध्ये परदेशी कंपन्यांशी (भारतात विकसित झालेल्या तंत्रामुळे) सहकार्याची आवश्यकता नाही अशा परदेशी कंपन्यांबरोबर भारतातील कंपन्यांनी केलेल्या सहकार्याचे करार रद्द करण्यात येतील. (उदाहरणार्थ, बिस्किटे, साबण, पावडर, चॉकलेट, कॉफी, विजेचे पंखे इत्यादी उद्योगांतील

## उद्योगांचे वर्गीकरण

सन 1956 च्या ठरावानुसार उद्योगांचे नव्याने वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले.

(1) पहिल्या वर्गातील उद्योगांची मक्तेदारी केवळ सरकारकडेच राहील असे ठरविण्यात आले.

या पहिल्या म्हणजे परिशिष्ट (अ) मध्ये पुढील 17 उद्योगांचा समावेश करण्यात आला : शस्त्रे आणि दारूगोळा, अणुशक्ती, लोखंड व पोलाद, अवजड ओतीव काम, अवजड यंत्रसामग्री, अवजड वीजयंत्रे, कोळसा, पेट्रोलिअम, तांबे व जस्त यांसारखे तसेच इतर महत्त्वाचे खाणकाम, विमान व हवाई वाहतूक, रेल्वे व रेल्वेवाहतूक, जहाजबांधणी व जहाज वाहतूक, टेलिफोन, तार संदेश, रेडिओ संदेश, वीजनिर्मिती आणि विजेचे वाटप.

सन 1948 च्या औद्योगिक धोरणविषयक ठरावात या वर्गात फक्त सहा उद्योगांचा समावेश करण्यात आला होता. 1956 च्या ठरावानुसार राज्यसंस्थेच्या मक्तेदारीत असलेले औद्योगिक क्षेत्र बरेच विस्तृत करण्यात आले.

(2) दुसऱ्या वर्गातील (म्हणजेच परिशिष्ट 'ब' मधील) उद्योग वाढत्या प्रमाणात सरकारच्या मालकीचे होत जातील. परिशिष्ट 'ब' मधील उद्योगांमध्ये फक्त सरकारच नवीन कारखाने स्थापन करू शकेल. या क्षेत्रातील उद्योगांमध्ये खासगी क्षेत्राकडून केले जाणारे कार्य सरकार या उद्योगांमध्ये काम करीत असलेल्या कामास पूरक राहील.

दुसऱ्या गटात (म्हणजेच परिशिष्ट 'ब' मध्ये) पुढील बारा उद्योगांचा समावेश करण्यात आला : ॲल्युमिनिअम आणि अलोह धातू (Non-ferrous Metals), यंत्रसामग्री, फेरोअलॉइज (म्हणजेच लोखंडाचे प्रमाण जास्त असणारे मिश्र धातू) हत्यारांचे पोलादाचे प्रकार (म्हणजेच महत्त्वाच्या यंत्रनिर्मितीसाठी वापरले जाणाऱ्या पोलादाचे प्रकार), अवजड रसायने, अँटिबायोटिक्स आणि इतर अत्यावश्यक औषधे, खते, कृत्रिम रबर, कोळशापासून कोक तयार करणे (Carbonisation of Coal), रस्त्यावरील व जलमार्गावरील वाहतूक.

सन 1948 च्या औद्योगिक धोरणविषयक ठरावात दुसऱ्या गटात फक्त कोळसा, लोखंड आणि पोलाद, विमान, जहाजबांधणी, दूरध्वनी, तार-संदेश आणि रेडिओवरील माहिती-वितरण आणि पेट्रोलिअम या सहा उद्योगांचाच समावेश करण्यात आला होता. 1956 च्या धोरणानुसार दुसऱ्या गटात (म्हणजेच परिशिष्ट 'ब' मध्ये) बारा उद्योगांचा समावेश करण्यात आला.

सन 1956 च्या धोरणानुसार परिशिष्ट 'ब' मधील उद्योग वाढत्या प्रमाणात सरकारच्या मालकीचे होत जातील. या गटातील उद्योगांमध्ये फक्त सरकारच नवीन कारखाने स्थापन करू शकेल. पण त्याचबरोबर सरकारने चालू केलेल्या या कारखान्यांबरोबर या उद्योगांमध्ये पूर्वी स्थापन झालेले खासगी कारखानेही चालू राहावेत व त्यांचे कार्य सरकार या क्षेत्रात करीत असलेल्या कार्यास पूरक राहावे असे ठरविण्यात आले.

(3) तिसऱ्या गटात बाकी राहिलेल्या (म्हणजेच परिशिष्ट 'क' मध्ये पहिल्या आणि दुसऱ्या गटात म्हणजेच परिशिष्ट 'अ' व 'ब' मध्ये उल्लेख नसलेल्या उद्योगांचा) सर्व उद्योगांचा समावेश करण्यात आला व त्या परिशिष्ट 'क' मधील उद्योग खासगी क्षेत्राकडे सोपविण्याचे ठरविण्यात आले. पण या तिसऱ्या गटातील उद्योगांच्या बाबतीतही असे स्पष्ट करण्यात आले की, खासगी क्षेत्रातील या उद्योगांनी आपला विकास घडवून आणताना सरकारने ठरवून दिलेल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांशी सुसंगत असेच धोरण आखावे व त्याचप्रमाणे त्यांचे कार्य चालावे. जरूर वाटल्यास सरकारकडून परिशिष्ट 'क' मधील उद्योगांचेही कायद्यानुसार नियंत्रण केले जाईल असे स्पष्ट करण्यात आले.

उद्योगांचे परिशिष्ट 'अ', 'ब' आणि 'क' यांत करण्यात आलेले वर्गीकरण काटेकोरपणे करण्यात आलेले नाही. याचाच अर्थ, अपवादात्मक परिस्थितीत सरकारला योग्य वाटल्यास परिशिष्ट 'अ' मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या काही उद्योगांमध्ये, खासगी व्यक्ती किंवा कंपन्या कारखाने स्थापन करू शकतील. त्याचप्रमाणे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना आवश्यक असणाऱ्या काही वस्तूंचे उत्पादन किंवा काही भागांचे उत्पादन खासगी उद्योग क्षेत्रात करण्यास परवानगी मिळू शकेल. त्याचप्रमाणे खासगी क्षेत्रातील उद्योगांना आपल्या गरजा भागविण्यासाठी सार्वजनिक उद्योगांवर अवलंबून राहावे लागणार आहे. दोहोंमध्ये परस्परपूरक असे औद्योगिक संबंध राहतील. शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा यांसारखे उद्योग सोडून इतर कोणत्याही उद्योगांमध्ये नवीन कारखाने स्थापन करण्यासाठी, राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने योग्य वाटल्यास सरकार खासगी उद्योगांचे व कारखान्यांचे सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न करील. खासगी उद्योजकांच्या मदतीने स्थापन करण्यात आलेल्या व सार्वजनिक क्षेत्रात स्थापन करण्यात आलेल्या कारखान्यांचे नियंत्रण करण्याचे अधिकार सरकारने आपणाकडे

त्याचा औद्योगिक विकासाच्या वेगावर अनिष्ट परिणाम झाला. सन 1956 नंतर विस्तारत गेलेले सार्वजनिक उद्योग म्हणजे भारताच्या औद्योगिक क्षेत्राच्या गळ्यात अडकविलेला फासच ठरला. सार्वजनिक क्षेत्र म्हणजे राजकारण्यांचे खासगी ... झाले होते.

(2) पुढील काळात औद्योगिक क्षेत्रातील निर्णय खासगी उद्योजकांनी घ्यावयाचे आहेत व त्यांना या बाबतीत जवळजवळ संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. अशा मुक्त औद्योगिक क्षेत्रात आपल्या औद्योगिक विकासाची गती ... स्पर्धासामर्थ्य वाढवून भारताला औद्योगिकदृष्ट्या विकसित व सामर्थ्यवान राष्ट्र बनवावयाचे आहे व ही जबाबदारी त्यांच्या आहे.

(3) भारत इतर अनेक देशांप्रमाणे 'मुक्त' अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करीत आहे. सन 1991 च्या औद्योगिक धोरणा... अनुसरून मक्तेदारी कायद्यात व 'फेरा' कायद्यात अनुरूप असे बदल करण्यात येत आहेत. एका अर्थी मक्तेदारी कायदा ... फेरा हे जवळजवळ रद्द झाल्यासारखेच आहेत.

(4) या नवीन औद्योगिक वातावरणात खासगी क्षेत्रातील उद्योजकांना मक्तेदारी कायदा, फेरा, सार्वजनिक उद्योगांमधील त्रुटींचा खासगी उद्योगांवर प्रतिकूल परिणाम, लाचलुचपतीने व दिरंगाईने बरबटलेली परवाना पद्धत इत्यादींना दोष देऊन आपले अपयश झाकता येणार नाही. भारताच्या औद्योगिक विकासाची फार मोठी जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली आहे.

(5) सन 1991 च्या औद्योगिक धोरणात लघुउद्योगांबाबत विशेष काही सांगण्यात आलेले नाही. यासंबंधी लवकर ... स्वतंत्र धोरण जाहीर करण्यात येईल असा उल्लेख करण्यात आला आहे. फक्त एप्रिल 1991 मध्ये ₹ 60 लक्षांपेक्षा कमी गुंतवणूक असणाऱ्या उद्योगांचा लघुउद्योगांत समावेश करण्यात येत आहे असे जाहीर करण्यात आले.

आजारी कारखान्यांचा प्रश्न कशा रीतीने सोडविला जाणार आहे यासंबंधीही उल्लेख नव्या औद्योगिक धोरणात नव्हता.

(6) कोणतेही विशिष्ट धोरण बराच काळ कार्यवाहीत असल्यास त्या धोरणापासून ज्यांचे हित झाले असे ... होतात व ते आपल्या हिताला धोका पोहोचविणाऱ्या कोणत्याही नव्या धोरणाला विरोध करतात, भारत हा लोकशाही ... आहे व तेथे कट्टर उजव्या पंथापासून तो कट्टर साम्यवादी विचारसरणीच्या लोकांचे गट आहेत.

त्यामुळे सन 1991 च्या औद्योगिक धोरणावर टीका होणे साहजिकच आहे. पंडित नेहरूंच्या मिश्र अर्थव्यवस्थेचा त्याग, समाजवादाला तिलांजली, अमेरिका व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या राजकीय दबावाला बळी, परकीय भांडवल... दारांकडे भारतीय औद्योगिक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे व परकीय भांडवलाचे वाढणारे प्राबल्य व त्यापासूनचे आर्थिक व राजकीय धोके - वगैरे टीका डाव्या गटातील राजकीय पुढाऱ्यांकडून ऐकू येणे साहजिकच आहे.

सुमारे 40 वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवावर आधारलेले सन 1991 चे औद्योगिक धोरण यशस्वी होईल किंवा नाही हे भविष्यकाळच ठरवेल. कारण भारताचा आजपर्यंतचा अनुभव असा आहे की, अत्यंत विचारपूर्वक तयार करण्यात आलेली विविध आर्थिक क्षेत्रातील धोरणे, त्यांच्या अत्यंत अकार्यक्षम कार्यवाहीमुळे अपेक्षित उद्दिष्टे साध्य करून घेण्यात अपयशी ठरलेली आहेत.

## 25.10 उद्योग (विकास व नियमन) कायदा, 1951

सन 1948 च्या औद्योगिक धोरणासंबंधी केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी इ. स. 1951 मध्ये उद्योग (विकास व नियमन कायदा) पास करण्यात आला.

सन 1951 उद्योग (विकास व नियमन) कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी किंवा महत्त्वाची कलमे पुढीलप्रमाणे होती.

(1) भारताच्या मध्यवर्ती सरकारकडून परवाना मिळविल्याशिवाय कोणत्याही नव्या उत्पादनसंस्थेची (म्हणजे कारखान्याची) स्थापना करता येणार नाही किंवा त्याचप्रमाणे अस्तित्वातील कोणत्याही औद्योगिक उत्पादनसंस्थेचा (कारखान्याचा) विस्तार करता येणार नाही. कारखाना ... अस्तित्वातील कारखान्यांचे ...

... कंपन्यांनी परदेशी कंपन्यांबरोबर केलेले करार मुदत संपताच त्यांचे नूतनीकरण करण्यात येणार नाही, कारण ... वस्तू निर्माण करण्याचे तंत्र भारतात विकसित झालेले आहे.)

(7) **आजारी कारखान्यांसंबंधीचे धोरण :** आजारी औद्योगिक कारखान्यांबाबत सर्वसाधारण व सर्वांना लागू ... असे धोरण न स्वीकारता प्रत्येक आजारी कारखान्यासाठी निश्चित स्वरूपाच्या धोरणाची कार्यवाही करण्यात येईल. ... आजारी कारखान्यातील कामगारांमध्ये बेरोजगारी पसरणार नाही हे पाहणे जरी आवश्यक असले तरी त्यासाठी सर्व समाजाला किती किंमत मोजावी लागेल याचाही विचार केला पाहिजे. या आजारी कारखान्यांमध्ये सार्वजनिक वित्तीय संस्थांचे पैसे फार मोठ्या प्रमाणावर अडकून पडले आहेत. हे कारखाने नुकसानीतच चालले असून सर्व समाजावर कर लादून ते चालू ठेवण्यात यावेत हे इष्ट नाही असे मत 1977 च्या धोरणात व्यक्त करण्यात आले.

ज्या कारखान्यांचे आजारपण व्यवस्थापकांच्या निष्काळजीपणामुळे झाले असेल अशा व्यवस्थापकांना कोणत्याही उद्योगात व्यवस्थापनाचे कार्य करण्यावर बंदी घालण्यात येईल असे ठरविण्यात आले.

(8) **मालक-मजूर संबंध :** सन 1977 मध्ये आणीबाणी उठविल्यावर कामगारांच्या संपात वाढ होऊन त्याचा उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला. आणीबाणीच्या काळात कामगारांच्या चळवळी दडपल्या गेल्याकारणाने आणीबाणी उठविल्याबरोबर कामगारांमधील उद्रेक घडून आला.

1977 साली जनता सरकारच्या औद्योगिक धोरणानुसार कामगारांना उद्योगांच्या व्यवस्थापनात स्थान देणे, व्यवस्थापनाच्या प्रत्येक पातळीवरील निर्णयांच्या बाबतीत कामगारांना आवश्यक ते अधिकार देणे व त्यांचे सहकार्य मिळविणे, कामगारांना भागभांडवल विकत देऊन मालकी हक्कात व व्यवस्थापनात सहभागी करून घेणे अशा रीतीने औद्योगिक परिस्थितीत अनुकूल बदल घडवून आणण्यानेच मालक-कामगार यांच्यामधील औद्योगिक संबंध मजबूत ... व समाधानकारक रीतीने प्रस्थापित करता येतील असे 1977 च्या औद्योगिक धोरणात स्पष्ट करण्यात आले.

## 1977 च्या औद्योगिक धोरणाचे मूल्यमापन

जनता सरकारमध्ये प्रधान मंत्रिपदावर आलेले चौधरी चरणसिंग हे महात्मा गांधींच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचे अनुयायी होते व त्यांनी गांधींच्या तत्त्वज्ञानावर आधारलेले औद्योगिक धोरण अवलंबिले असे सांगितले जाते.

1977 च्या औद्योगिक धोरणाचा भर लघुउद्योगांच्या व ग्रामोद्योगांच्या विकासावर होता कारण त्यामुळे ग्रामीण भागात रोजगारात वाढ होणार होती व औद्योगिक विकेंद्रीकरण घडून येणार होते त्याचप्रमाणे औद्योगिक खासगी मक्तेदारीच्या वाढीवर मर्यादा पडणार होत्या.

या दृष्टिकोनातून पाहता 1977 चे औद्योगिक धोरण म्हणजे 1956 च्या औद्योगिक धोरणाची पुनरावृत्तीच होती. फक्त 1956 च्या धोरणात ज्या त्रुटी दृष्टोत्पत्तीस आल्या त्या 1977 च्या धोरणात दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. म्हणजेच 1956 च्या आणि 1977 च्या औद्योगिक धोरणात बरेच साम्य होते.

लघुउद्योग व ग्रामोद्योगांच्या विकासासाठी 1956 चेच धोरण पुढे ठेवण्यात आले. त्या धोरणातील बदल एवढाच की, 1956 च्या धोरणाने 180 वस्तूंचे उत्पादन फक्त लघुउद्योग क्षेत्रात व्हावे असे ठरविले होते, तर 1977 च्या धोरणाने ही संख्या 807 पर्यंत वाढवली त्यामुळे जनता सरकार काँग्रेस सरकारच्या एक-दोन पावले पुढे गेले इतकेच. पण हे लक्षात घेतले पाहिजे की, सुमारे 2000 वस्तूंचे उत्पादन लघुउद्योग क्षेत्रात होत असूनही फक्त 807 वस्तूंचेच उत्पादन लघुउद्योग क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात आले. ज्या वस्तूंचे उत्पादन लघुउद्योगात करणे शक्य आहे अशा वस्तूंचे उत्पादन लघुउद्योग क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात येईल असे तत्त्व जनता सरकारने प्रतिपादिले. पण धोरण आखताना मात्र ते तत्त्व संपूर्णपणे अमलात आणले गेले नाही. त्याचप्रमाणे वस्तूंच्या वर्गीकरणामुळेही वस्तूंची संख्या 807 पर्यंत वाढल्याचे दिसते. ... उदाहरणार्थ, भिंती रंगविणारे ब्रश आणि टूथब्रश हे निरनिराळे दाखविण्यात आले. त्याचप्रमाणे निरनिराळ्या तऱ्हेच्या ... प्रकार म्हणजे निरनिराळ्या वस्तू समजण्यात आल्या व अशा रीतीने वस्तूंची संख्या 807 पर्यंत फुगविण्यात आली.

1956 च्या धोरणाने जरी 180 वस्तूंचे उत्पादन लघुउद्योग क्षेत्रासाठी राखून ठेवले तरी काहीना काही निमित्ताने ... बऱ्याच वस्तूंचे उत्पादन मोठ्या उद्योगांकडून केले जात असे. उदाहरणार्थ, अशा वस्तू आम्ही निर्यात करणार असे सांगून मोठे उद्योग ... उत्पादन करीत; पण नंतर त्या वस्तू देशातील बाजारातच विकत असत.

सार्वजनिक बांधणी खात्याकडे
चे व त्यांच्या सुट्या भागांच्या
विंद रानडे यांनी म्हटल्याप्रमाणे
त भारतात कापड आणि ताग
मिक व त्याचप्रमाणे बाजारपेठ
ापर्यंत भारतातील औद्योगिक

कडून (विशेषत: जर्मनीकडून)
ल परिस्थिती निर्माण झाली.
झाल्यास तो पाहिजेच होता.
ठी 1916 साली 'औद्योगिक
ाच्या शक्यतेसंबंधी अनुकूल

ापड, तागाचा माल, सिमेंट,
 आला.
र देशांनी आपली युद्धामुळे
ुरोपमधील इतर देशांकडून
ुद्धाच्या काळात जे उद्योग
वर विकास घडवून आणला
यशस्वी रीतीने स्पर्धा करणे

त्याचा थोडाफार परिणाम
ण्यात आले. त्या धोरणात
काड्यापेट्या आणि कागद

प्रमाणे जपानकडून केल्या
तीमुळे भारतातील विविध
गुंतल्यामुळे शस्त्रास्त्रे व
करावे लागले. युद्धजन्य
कासाला मदत करण्याचे
ध उद्योगांच्या विकासाला
ला. कापड, ताग, साखर
ऱ्याच मोठ्या प्रमाणावर

कसा घडून आला, हे



तक्ता क्र. 23.1 : औद्योगिक उत्पादन

| | युनिट | 2011-12* | 2010-11* | 2009-10* | 1990-91 | 1980-81 |
|---|---|---|---|---|---|---|
| | Mn. T. | 27.4 | 24.4 | 18.8 | 12.0 | 5.1 |
| | '000t. | 972 | 967 | 991 | 705 | 568 |
| | '000t. | 311 | 283 | 278 | 170 | 139 |
| | '000t. | 1,235 | 827 | 1,122 | 850 | 753 |
| | '000t. | 4,372 | 4,713 | 4,193 | 1,824 | 1,298 |
| | Bn. sq. mtr. | 60.5 | 62.6 | 60.4 | 22.9 | 11.1 |
| | Bn. sq. mtr. | 2.3 | 2.2 | 2.0 | 2.6 | 4.2 |
| | Bn. sq. mtr. | 58.2 | 60.4 | 58.4 | 20.3 | 6.9 |
| ...स्टील # | Mn. t. | 73.4 | 68.6 | 60.6 | 13.5 | 6.8 |
| | '000t. | 770 | 598 | 1,486 | 262 | 71 |
| ...मिनिअम | '000t. | 963 | 790 | 1,045 | 451 | 199 |
| ...क अभियांत्रिकी | | | | | | |
| | ₹ crs. | 2,364 | 1,840 | 1,502 | 773 | 169 |
| | | | | | | |
| ...साधने † | '000s | 910.2 | 752.6 | 566.6 | 145.5 | 71.7 |
| ... आणि जमीन रोलर | '000s | 2,513.2 | 2,452.8 | 1,910.5 | 220.8 | 49.4 |
| ...सायकल आणि स्कूटर | '000s | 12,007 | 10,527 | 8,445 | 1,843 | 447 |
| | Mn. | n.a. | n.a. | 12.7 | 7.1 | 4.2 |
| ...क्टर | '000s | 549 | 465 | 374 | 142 | 71 |
| ...इंजिन | '000s | 1,565 | 1,484 | 1,251 | 158 | 174 |
| ...डिझेल पंप | '000s | 3,014 | 3,139 | 2,892 | 19 | 431 |
| ...कल अभियांत्रिकी | | | | | | |
| ...ट्रान्सफार्मर | 000 nos. | 6,517 | 7,482 | 6,957 | n.a. | n.a. |
| | Mn. hp. | 15.4 | 14.5 | 14.7 | 5.9 | 4.1 |
| | Mn. | n.a. | n.a. | 10.2 | 4.2 | 4.2 |
| | Mn. | n.a. | n.a. | 443 | 274 | 198 |
| ...मिनिअम कंडक्टर्स | '000t | 98 | 98 | 113 | 68 | 86 |
| ... आणि इतर खते | | | | | | |
| | '000t | 21,984 | 21,880 | 21,112 | n.a. | n.a. |
| ...फॉस्फेट | '000t | 3,962 | 3,537 | 4,247 | n.a. | n.a. |
| | '000t | 2,427 | 2,298 | 2,051 | 1,385 | 563 |
| | '000t | 2,211 | 2,168 | 2,168 | 992 | 578 |
| | '000t | 4,130 | 3,837 | 3,571 | 2,088 | 1,149 |
| ...टायर्स | Mn. | 13.5 | 13.5 | 13.8 | 20.1 | 8.0 |
| ...टायर्स | Mn. | n.a. | n.a. | 79.4 | 25.0 | 27.0 |
| | Mn.t. | 223.5 | 209.7 | 200.7 | 48.8 | 18.6 |
| | MMU | n.a. | n.a. | 1,671 | 25 | 337 |
| | MMU | n.a. | n.a. | 112 | 221 | 60 |

* Provisional # Including Secondary Producers.
† Including cotton, mixed/blended and man-made fibre fabrics
संदर्भ : स्टॅटिस्टिकल आउटलाइन ऑफ इंडिया - 2014-15, पान क्र. 63, 64, 65

♦♦♦

7. पायाभूत व अवजड अशा उद्योगांची (लोखंड व पोलाद, इतर धातू, रसायने, अवजड यंत्रसामग्री, संरक्षणविषयक उद्योग) स्थापन करून त्यांचा जलद विकास घडवून आणणे व अशा उद्योगांच्या बाबतीत परदेशांवर विसंबून राहणे कमी करून शक्यतो भारतास स्वयंपूर्ण बनविणे.
8. लघुउद्योग व कुटीरोद्योग यांचा विकास व त्याचप्रमाणे हस्तोद्योग व सहकारी तत्त्वावर चालविल्या जाणाऱ्या उद्योगांचा विकास घडवून आणणे.
9. भारतात तयार होणाऱ्या औद्योगिक वस्तूंच्या निर्यातीस अधिकाधिक प्रोत्साहन देणे.
10. शास्त्रीय आणि उद्योगविद्याविषयी तंत्रज्ञान शिकविणाऱ्या संस्थांची स्थापना करणे व अशा संस्थांद्वारा विविध उद्योगांच्या विकासास आवश्यक असणारे कौशल्य शिकण्याची लोकांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे व अशा रीतीने 'औद्योगिक संस्कृतीचा' प्रसार घडवून आणणे.

हे लक्षात ठेवले पाहिजे की, वरील उद्दिष्टे ही सर्वसाधारण उद्दिष्टे होती आणि आहेत व ती सर्व पंचवार्षिक योजनांमधील औद्योगिक क्षेत्रांच्या बाबतीत लागू आहेत. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत अस्तित्वात असलेली औद्योगिक परिस्थिती लक्षात घेऊन वरील उद्दिष्टांपैकी काहींवर अधिक भर देणे व काही उद्दिष्टांवर कमी भर देणे. त्याचप्रमाणे वरील उद्दिष्टांच्या चौकटीत विविध उद्योगांमध्ये किती गुंतवणूक करावयाची, त्यांची किती वेगाने वाढ घडवून आणावयाची व त्यांची उत्पादनाची लक्ष्ये ठरवून देणे इत्यादी गोष्टी प्रत्येक पंचवार्षिक योजनेत करण्यात आल्या. भारताच्या औद्योगिक धोरणाचा विकास हा अशा तऱ्हेने होत गेल्याचे आढळते. वरील चौकट व उद्दिष्टे लक्षात ठेवून भारताच्या औद्योगिक धोरणाच्या तपशिलाचा विचार करणे आवश्यक आहे.

## 25.3 1948 चा औद्योगिक धोरणविषयक ठराव

दुसरे महायुद्ध नुकतेच संपले होते; पण त्या काळात निर्माण झालेल्या किंमतवाढीची घोडदौड युद्धोत्तर काळातही तशीच चालू होती. अशा भांडवली व उपभोग्य विविध औद्योगिक वस्तूंचा सर्वत्र तुटवडा भासत होता. इ. स. 1947 मध्ये अखंड भारताच्या विभाजनामुळे कापड, ताग व इतर उद्योगांपुढे (विशेषतः ताग उद्योगापुढे) कठीण समस्या निर्माण झाल्या होत्या. कारण देशाच्या विभाजनामुळे कापसाचा व तागाचा तुटवडा भासत होता व तो कसा भरून काढावयाचा हा प्रश्न भारतातील कापड आणि ताग या दोन जुन्या व प्रमुख उद्योगांना भेडसावीत होता. जलद गतीने होणारी भाववाढ रोखण्याच्या दृष्टीने औद्योगिक क्षेत्रात अधिकाधिक गुंतवणूक करण्याची आवश्यकता भासत होती. भारत स्वतंत्र होण्याआधी व त्यानंतरही श्रमिक वर्ग सर्व मोठ्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्यात यावे अशी जोरदार मागणी करीत होता, तर खासगी उद्योजक औद्योगिक क्षेत्रात अधिकाधिक वैयक्तिक स्वातंत्र्य देण्यात यावे अशी तेवढीच जोरदार मागणी करीत होते.

वरील परिस्थिती विचारात घेता, भारत सरकारने औद्योगिक धोरण काय राहील व त्याची निश्चित दिशा व दृष्टिकोन कोणता राहील हे स्पष्ट करण्याची आवश्यकता होती. या पार्श्वभूमीवर औद्योगिक धोरणविषयक 1948 चा ठराव संसदेत संमत करण्यात आला.

### 1948 च्या औद्योगिक धोरणविषयक ठरावाची वैशिष्ट्ये

इ. स. 1948 चा औद्योगिक धोरणविषयक ठराव हा सरकारचे या क्षेत्रातील धोरण काय राहील हे स्पष्ट रीतीने सांगणारा व सर्वसमावेशक असा पहिलाच ठराव होता असे म्हणणे योग्य ठरेल.

1948 च्या ठरावाने भारतासाठी 'मिश्र अर्थव्यवस्थेच्या स्थापनेचे' उद्दिष्ट स्पष्ट केले, म्हणजेच सार्वजनिक क्षेत्रात आणि खासगी क्षेत्रात कोणकोणत्या उद्योगांचा समावेश केला जाईल हे स्पष्ट केले. याचाच अर्थ सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांबरोबरच खासगी क्षेत्रातही काही उद्योगांचा समावेश करण्यात आला.

### उद्योगांचे वर्गीकरण

1948 च्या औद्योगिक धोरणविषयक ठरावाने विविध उद्योगांची खालील चार गटांत विभागणी केली.

(1) शस्त्रे आणि दारूगोळा, अणुशक्ती व रेल्वेवाहतूक या उद्योगांच्या बाबतीत मध्यवर्ती सरकारची संपूर्ण मक्तेदारी राहील. याचबरोबर हेही स्पष्ट करण्यात आले की, युद्धजन्य परिस्थितीत देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक असलेला कोणताही उद्योग सरकार आपल्या ताब्यात घेऊ शकेल किंवा आपल्या संपूर्ण नियंत्रणाखाली आणू शकेल.

व्हावे व त्याचप्रमाणे ज्या उद्योगांमुळे साहाय्यक उद्योगांच्या विकासाला गती मिळेल त्यांचा विकास घडवून आणणे असे ठरले.

वर उल्लेख केलेल्या बदलांमुळे मक्तेदारी व फेरा कंपन्या आपल्या उत्पादनात अपेक्षित वाढ घडवून आणून देशाच्या औद्योगिकीकरणाची सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे साध्य करून घेण्यास मदत करतील, अशी आशा व्यक्त करण्यात आली.

इ. स. 1985-86 मध्येही औद्योगिक क्षेत्रातील कालबाह्य झालेली नियंत्रणे रद्द करणे, उद्योगांचे पुनर्वटन करणे, कारखाना स्थापण्यासाठी व त्याच्या विकासासाठी उद्योजकांना ज्या क्लिष्ट प्रक्रियांतून जावे लागत असे त्या प्रक्रिया सुलभ करणे इत्यादी धोरणे औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनात जलद गतीने वाढ घडवून आणण्याच्या दृष्टीने अधिक परिणामकारक करण्याच्या दृष्टीने पावले उचलली गेली.

मार्च 1985 मध्ये मध्यवर्ती सरकारने 25 उद्योग आणि 82 औषधांचे प्रकार व ते तयार करण्याच्या कृती-परवाना यादीच्या उद्योगांतून गाळल्याचे जाहीर केले. (याचाच अर्थ, अशा उद्योगांमधील कारखाने स्थापावयास औद्योगिक परवान्याची आता गरज नाही असे नमूद करण्यात आले.) अशा परवाना यादीतून वगळलेल्या उद्योगांमध्ये कारखाना स्थापावयाचा झाल्यास उद्योजकाने सन 1951 च्या औद्योगिक (विकास व नियमन) कायद्यानुसार परवान्यासाठी अर्ज करण्याची व परवानगी मिळविण्याची जरुरी नाही, फक्त संबंधित अधिकाऱ्याकडे कारखान्यांची नोंद करावयाची. याबाबत अशाच अटी घालण्यात आल्या की, सदरचे कारखाने मक्तेदारी व फेरा कंपन्यांच्या सदरात येऊ नयेत. ज्या वस्तूंचे उत्पादन करावयाचे त्या वस्तू लघुउद्योग क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात आलेल्या असू नयेत आणि जो कारखाना स्थापावयाचा तो निर्देश केलेल्या शहरी विभागांत स्थापन करावयाचा नाही.

डिसेंबर 1985 मध्ये मक्तेदारी उद्योगांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या 27 उद्योगांपैकी 22 उद्योग परवाना यादीतून वगळण्यात आले. पण अट एवढीच घालण्यात आली की, संबंधित उद्योगांतील कारखाने मध्यवर्ती सरकारने जाहीर केलेल्या औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या प्रदेशात स्थापले जावेत.

जुलै व सप्टेंबर 1986 मध्ये काही उद्योग (गव्हाचे पीठ करण्याचा व काही रासायनिक उद्योग) परवाना यादीतून वगळण्यात आले. याचा उद्देश त्या-त्या उद्योगांतील उत्पादनाच्या वाढीस चालना देणे हे आहे.

जानेवारी 1986 मध्ये काच, पोलादी पाइप व नळ्या, कृत्रिम धागा, विजेच्या तारा, बॉलबेअरिंग, काही प्रकारची यंत्रे आणि रसायने या उद्योगांना काही जादा सवलती, त्या उद्योगातील वस्तूंचे वर्गीकरण वाढवून (Broad Banding) देण्यात आल्या.

एप्रिल 1982 मध्ये परवान्यापेक्षा जादा स्थापित उत्पादन क्षमतेच्या बाबतीत उदार धोरण अनुसरण्यात इ. स. 1986 मध्ये या बाबतीतील उदार धोरण सातव्या योजनेच्या काळापुरते (1985-90) अधिक उदार करण्यात आले व आणखी काही कारखान्यांना या धोरणाचा फायदा देण्याचे ठरविण्यात आले.

सन 1984-85 व 1985-86 मध्ये मक्तेदारी कंपन्यांच्या बाबतीत अधिक उदार धोरण अनुसरण्यात आले. मक्तेदारीसंबंधी 1969 मध्ये ज्या वेळी कायदा करण्यात आला त्या वेळी मक्तेदारी वर्गात समाविष्ट होणाऱ्या आणि त्या कायद्यातील तरतुदी लागू करण्यासंबंधी कायदा करण्यात आला, तेव्हा मक्तेदारी कंपनीची व्याख्या ज्या कंपनीची उत्पादक जिंदगी ₹ 20 कोटी किंवा अधिक असेल अशा औद्योगिक कंपन्या अशी करण्यात आली. या व्याख्येत बदल करून ही मर्यादा ₹ 20 कोटींवरून ₹ 100 कोटींपर्यंत वाढविण्यात आली. याचाच अर्थ मक्तेदारीविषयक कायदा ₹ 100 कोटी व अधिक उत्पादक जिंदगी असणाऱ्या औद्योगिक कंपन्यांनाच लागू करण्याचे ठरविण्यात आले. याचाच अर्थ मक्तेदारी कंपन्यांच्या बाबतीतही उदार धोरण अनुसरण्याचे ठरविण्यात आले. त्याचप्रमाणे मक्तेदारी व फेरा कंपन्यांना ज्या वस्तूंचे उत्पादन लघुउद्योग क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात आलेले नाही अशा वस्तूंचेही त्या कंपन्या उत्पादन करू शकतील अशी परवानगी देण्यात आली. त्याचप्रमाणे मागासलेल्या प्रदेशांमध्ये अशा कंपन्यांना प्रवेश देण्यासाठी निर्यातीबाबतचे जे निर्बंध घालण्यात आले होते, तेही शिथिल करण्यात आले.

निर्यातीबाबतच्या धोरणातही काही सुधारणा करण्यात आल्या. परवानगीची जरुरी असलेल्या औद्योगिक कंपन्यांनी ... जादा ... अशा वाढीव उत्पादनासाठी परवानगी घेण्याची जरुरी नाही असे ठरविण्यात

समांतर जाणारी क्षेत्रे नसून, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांकडून विविध सोई-सुविधा (रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक, वीज, लोखंड व पोलाद, कोळसा इत्यादी) खासगी क्षेत्रास पुरविल्या जाणार आहेत. वर निर्देशिलेल्या सोई-सुविधा खासगी क्षेत्राकडून पुरविल्या जाणे अशक्य आहे असे 1956 च्या धोरणाच्या पुरस्कर्त्यांनी प्रतिपादन केले व काही अंशी ते योग्य आहे यात संशय नाही. फक्त ते कार्य सार्वजनिक क्षेत्राकडून अधिक कार्यक्षम रीतीने व्हावयास पाहिजे व तसे करणे शक्य होते हे निश्चित.

1956 च्या धोरणात विविध उद्योगांचे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग व खासगी क्षेत्रातील उद्योग असे जरी वर्गीकरण करण्यात आले तरी 1956 च्या ठरावातील त्रुटींचा फायदा घेऊन खासगी क्षेत्राने सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवलेल्या उद्योगातही प्रवेश करून प्रगती केल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, खते, पेट्रोलिअम, रासायनिक उद्योग, कोळसा इत्यादि उद्योगांमध्ये खासगी क्षेत्राने प्रवेश मिळविला. पुढील दोन किंवा तीन दशकांत खासगी क्षेत्रातील उद्योगांनी जी प्रगती केली ती पाहता, 1956 च्या ठरावात खासगी क्षेत्रातील उद्योगांबद्दल सरकारने संशयी वृत्ती स्वीकारली असे म्हणणे योग्य होणार नाही, असे 1956 च्या धोरणाच्या पाठीराख्यांचे मत होते, तर खासगी क्षेत्रातील उद्योगांनी केलेली प्रगती ही सरकारने त्यांच्या विकासाच्या मार्गात अनेक अडचणी निर्माण केले असले तरी, त्यातून मार्ग काढून त्या क्षेत्राने प्रगती केली आहे असे खासगी उद्योजकांचे मत आहे.

एवढे निश्चित की, 1956 च्या उद्योगविषयक धोरणाच्या ठरावाने भारतातील औद्योगिक क्षेत्राला विशिष्ट दिशा व आकारबंध दिला. याचा अर्थ, औद्योगिक क्षेत्राने भावी काळात जे यश मिळविले व जे अपयश पदरी पडले त्या दोहोंची जबाबदारी प्रामुख्याने 1956 च्या उद्योगविषयक धोरणाच्या ठरावावर पडते हे निश्चित.

## 25.5 सन 1948 आणि 1956 च्या औद्योगिक धोरणांची तुलना

सन 1956 चे औद्योगिक धोरण 1948 च्या औद्योगिक धोरणापेक्षा खालील बाबतीत भिन्न होते असे दिसून येते.

(1) 1948 च्या धोरणापेक्षा 1956 च्या औद्योगिक धोरणाने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना व त्यांच्या विकासाला अधिक महत्त्व दिल्याचे दिसून येते.

उदाहरणार्थ, 1948 च्या धोरणाने सरकारची संपूर्ण मक्तेदारी फक्त 6 उद्योगांपुरती मर्यादित केली होती तर 1956 च्या धोरणाने अशा उद्योगांची संख्या 17 पर्यंत वाढविल्याचे आढळते.

सन 1956 च्या धोरणाने उद्योगांचा एक नवा मार्ग निर्माण केला व त्यात निर्देशिलेल्या उद्योगांमध्ये भावी काळात फक्त सरकारच नवीन कारखाने उभारू शकेल असे स्पष्ट केले.

सन 1956 च्या धोरणाने असे स्पष्ट केले की, समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट साध्य करून घेण्याच्या दृष्टीने सर्व महत्त्वाचे अवजड व मूलभूत उद्योग, सार्वजनिक सेवा पुरविणारे उद्योग व ज्या उद्योगात जी मोठी गुंतवणूक करावी लागते ती करणे खासगी उद्योजकांच्या आवाक्याबाहेर आहेत. या सर्व उद्योगांच्या बाबतीत सरकारने सर्वस्वी जबाबदारी स्वीकारावी व अशा उद्योगांची भविष्यकाळातील प्रगतीची जबाबदारी सरकारने म्हणजेच राज्यसंस्थेने स्वीकारावी.

(2) काही परिस्थितीत खासगी क्षेत्रातील उद्योगांचे राष्ट्रीयीकरण केले जाईल अशी जी धमकी 1948 च्या ठरावात होती, अशी धमकी किंवा खासगी क्षेत्रातील उद्योगांचे राष्ट्रीयीकरण केले जाईल अशी धमकी 1956 च्या ठरावात नव्हती. त्या दृष्टीने आपला विकास करून घेण्यावर लक्ष केंद्रित करणे खासगी क्षेत्रातील उद्योगांना शक्य झाले. 1956 च्या धोरणाने हेही स्पष्ट केले की, वित्तीय संस्था स्थापन करून त्यांच्याकडून खासगी क्षेत्रातील उद्योगांना वित्तीय मदत दिली जाईल व भावी काळात तशी भरपूर वित्तीय मदत दिली गेली त्यामुळे खासगी उद्योगांना आपला विकास घडवून आणणे शक्य झाले.

(3) परिशिष्ट 'अ' आणि 'ब' मध्ये समाविष्ट न केलेल्या उद्योगांचा सरकारच्या मदतीने किंवा अशा मदतीशिवाय विकास करण्याचे स्वातंत्र्य खासगी उद्योग क्षेत्राला 1956 च्या धोरणाने देण्यात आले. 1956 च्या ठरावाने खासगी आणि सहकारी उद्योग राष्ट्रीय उत्पन्नात भरपूर भर घालतील अशी अपेक्षा व्यक्त केली.

(4) देश 1947 मध्ये स्वतंत्र झाला होता. भारताचे विभाजन झाल्याकारणाने उद्योग क्षेत्रात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. उद्योजकांच्या मनात उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणाची भीती निर्माण झाली होती व राज्यघटना अद्याप तयार होत होती अशा गोंधळाच्या परिस्थितीत काही ठोस पावले शक्यतो लवकर उचलणे आवश्यक झाले होते. अशा

(2) दुसऱ्या वर्गात लोखंड आणि पोलाद, कोळसा, जहाजबांधणी, टेलिफोन, रेडिओ (रेडिओ-सेट सोडून) आणि खनिजद्रव्ये यांचा समावेश केला गेला, या उद्योगांच्या बाबतीत असे ठरविण्यात आले की, जे खासगी मालकीचे कारखाने या उद्योगांमध्ये उत्पादन करीत आहेत त्यांना त्यांचे उत्पादन तसेच पुढे चालू ठेवता येईल; पण वरील उद्योगांमध्ये नवीन कारखाने मात्र सरकारकडून काढण्यात येतील व त्यांची मालकी व कार्यवाही सरकारकडे राहील. त्याचबरोबर असेही घोषित करण्यात आले की, या दुसऱ्या वर्गातील काही उद्योग राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने जरूर वाटल्यास सरकार ताब्यात घेऊ शकेल व सरकारकडून ते उद्योग चालविले जातील.

(3) तिसऱ्या गटात पुढील उद्योगांचा समावेश करण्यात आला- मीठ, ट्रॅक्टर, मोटारी, वीज, यंत्रे, प्राइम मूव्हर्स, रसायने, खते, औद्योगिक अल्कोहोल, कापड, लोकर, सिमेंट, साखर, कागद, हवाई व सागरी वाहतूक, खनिज व देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे इतर उद्योग.

तिसऱ्या गटातील उद्योग देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्यामुळे त्यांचे नियमन व नियंत्रण करण्याचे अधिकार मध्यवर्ती सरकारकडे राहतील असे ठरविण्यात आले.

(4) वरील तीन गटांत समावेश न करण्यात आलेल्या उद्योगांचा चौथ्या गटात समावेश करण्यात आला व ते खासगी व सहकारी क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात आले. पण चौथ्या गटातील एखाद्या उद्योगाची प्रगती समाधानकारक नाही असे आढळून आल्यास त्या खासगी क्षेत्रातील उद्योगात हस्तक्षेप करण्याचा अधिकार सरकारने आपणाकडे राखून ठेवला.

सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रामध्ये कोणकोणते उद्योगधंदे असावेत यासंबंधीच्या वर उल्लेखिलेल्या वर्गीकरणाशिवाय, औद्योगिक धोरणविषयक 1948 च्या ठरावात लघुउद्योग आणि कुटीरोद्योग, औद्योगिक कामगार, परकीय भांडवल व सामाजिक न्याय यासंबंधीचेही सरकारने आपले धोरण काय राहील हे स्पष्ट केले.

## लघुउद्योग आणि कुटीरोद्योग

एक व्यक्ती संघटनांना आणि सहकारी संस्थांना लघुउद्योगांमुळे व कुटीरोद्योगांमुळे भरपूर वाव मिळत असल्यामुळे व त्याचप्रमाणे या उद्योगांमुळे देशात औद्योगिक विकेंद्रीकरणास मदत होत असल्यामुळे सन 1948 च्या औद्योगिक धोरणासंबंधीच्या ठरावात लघुउद्योगांना आणि कुटीरोद्योगांना व त्यांच्या विकासाला अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान दिले गेले.

## औद्योगिक कामगार व उद्योजक यामधील औद्योगिक संबंध

औद्योगिक कामगार आणि उद्योजक यांच्यामध्ये मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने योग्य असे औद्योगिक संबंधाविषयी धोरण आखले जावे असे 1948 च्या ठरावात म्हटले.

औद्योगिक उत्पादन प्रक्रिया सुरक्षितपणे व समाधानकारक रीतीने चालू राहण्यासाठी मालक व औद्योगिक कामगार यांच्यामधील तंटे कमी केले जाऊन त्यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध प्रस्थापित होणे व ते टिकवून ठेवणे देशाच्या औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक असते. म्हणूनच या बाबतीत असे धोरण स्वीकारले जावे की, ज्यामुळे मालक, औद्योगिक कामगार आणि उपभोक्ते या सर्व गटांचे हित साधले जाईल असे 1948 च्या ठरावात मान्य करण्यात आले त्याचबरोबर औद्योगिक श्रमिकांना योग्य वेतन दिले जाण्याच्या दृष्टीने व त्यांना औद्योगिक व्यवस्थापनात सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने योग्य अशी यंत्रणा निर्माण केली जावी.

## परकीय भांडवलासंबंधीचे धोरण

भारत स्वतंत्र होण्यापूर्वी भारतातील परकीय भांडवलासंबंधी बरेच कटू लिहिले व बोलले जात असे. त्यामुळे या संबंधीचे भारत सरकारचे धोरण काय राहील हे स्पष्ट करण्याची आवश्यकता होती.

भारतात जलद औद्योगिकीकरण घडवून आणण्याच्या दृष्टीने व ते शक्य होण्यासाठी परकीय भांडवल व परकीय तांत्रिक कौशल्य आवश्यक असल्यामुळे, भारतात परकीय भांडवल गुंतविले जाण्यासाठी योग्य अशी परिस्थिती निर्माण केली गेली पाहिजे असे 1948 च्या धोरणात ठरविले गेले. परकीय भांडवलाचे व तंत्राचे भारत स्वागत करीत असला तरी

## प्रकरण 24

# भारतात औद्योगिकीकरणाची आवश्यकता

भारत हा शेकडो वर्षे कृषिप्रधान देश राहिला आहे व शेतीव्यवसाय हा फक्त व्यवसाय न राहता, ती एक जीवन-पद्धती बनल्याचे आढळून येते. त्यामुळे असा प्रश्न निर्माण होतो की, भारतातील शेतीक्षेत्रात अधिकाधिक प्रगती करून देशातील बहुसंख्य लोकांचे जीवनमान सुधारता येणार नाही काय ? शेतीक्षेत्रात नेत्रदीपक प्रगती करून भारतात प्रचंड प्रमाणावर आढळणाऱ्या बेरोजगारांचे प्रश्न यशस्वी रीतीने सोडविता येणार नाहीत काय ? युरोपातील डेन्मार्क व हॉलंडसारखे देश अद्याप कृषिप्रधान देश असून त्यांचा विकसित देशांच्या गटात समावेश होत नाही काय ? भारतातील पंजाब या घटकराज्यात खासगी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील एकही मोठा उद्योग अस्तित्वात नसताना हरित क्रांतीच्या जोरावर तेथील जनतेचे दरडोई वार्षिक उत्पन्न भारतातील इतर घटकराज्यांच्या तुलनेने सर्वाधिक नाही काय ? त्यामुळे मूलभूत असा प्रश्न उद्भवतो की, भारतात औद्योगिकीकरणाची आवश्यकता आहे काय ? व त्याचे उत्तर होकारार्थी असल्यास औद्योगिकीकरण का आवश्यक आहे ?

भारतात जलद गतीने औद्योगिकीकरण घडवून आणण्याची आवश्यकता खाली दिलेल्या कारणांमुळे आहे -

(1) **बेरोजगारीवर परिणामकारक उपाययोजना :** भारतातील एकूण श्रमिकांच्या संख्येपैकी 15.3 कोटी श्रमिक (म्हणजेच एकूण श्रमिकांच्या संख्येपैकी 58 टक्के श्रमिक) शेतीक्षेत्रात काम करीत असल्याचे आढळून येते. भारतातील एकूण जमिनीपैकी शेतीस योग्य अशी जमीन सुमारे 16.6 लक्ष हेक्टर एवढी आहे. या शेतीस योग्य अशा जमिनीत फारच कमी वाढ झालेली आहे; पण शेतीक्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या मात्र सतत वाढत आहे.

शेतीक्षेत्राच्या मानाने त्या क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या अतिरिक्त असल्याने व शेतीक्षेत्रात घटत्या फलाचा सिद्धान्त सापेक्षतेने लवकर कार्यान्वित होत असल्यामुळे भारतातील शेतीक्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांची सीमांत उत्पादकता शून्य आहे असे म्हटले जाते. याचाच अर्थ, भारतातील शेतीक्षेत्रातून बऱ्याच श्रमिकांना इतर क्षेत्रांत हलविण्यात आले तरी शेतीक्षेत्रातील एकूण वार्षिक उत्पादन कमी होणार नाही. याचाच दुसरा अर्थ म्हणजे भारतातील शेतीक्षेत्रात फार मोठ्या प्रमाणावर प्रच्छन्न बेरोजगारी आहे.

शेतीक्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांना फार मोठ्या संख्येने दुसऱ्या क्षेत्राकडे वळविणे आवश्यक आहे, कारण ते शेतीक्षेत्रात चालू परिस्थितीत उत्पादनात कोणतीही भर घालत नाहीत.

शेतीक्षेत्राशी तुलना करता औद्योगिक क्षेत्रात वाढत्या उत्पादनाचे तत्त्व बऱ्याच काळापर्यंत कार्यान्वित असते. याचा अर्थ, भारतातील शेतीक्षेत्रातून बऱ्याच मोठ्या संख्येने श्रमिकांना औद्योगिक क्षेत्राकडे वळविल्यास त्यांच्याकडून बराच काळपर्यंत औद्योगिक उत्पादनात भर घातली जाण्याची शक्यता आहे. शेतीक्षेत्रातील अतिरिक्त श्रमिकांना उत्पादक असे काम फार मोठ्या प्रमाणावर औद्योगिक क्षेत्रच पुरवू शकेल. याचा अर्थ, भारतात प्रचंड प्रमाणात आढळून येणाऱ्या बेरोजगारीवर व गरिबीवर परिणामकारक उपाय म्हणून भारतात जलद गतीने औद्योगिकीकरण घडवून आणणे आवश्यक आहे.

(2) **श्रमिकांना उत्पन्नाची साधने पुरविणे :** भारतातील लोकसंख्या इतकी झपाट्याने वाढत आहे की त्यामुळे श्रमिकांच्या संख्येतही प्रचंड वाढ होणार आहे. भावी काळात शेतीक्षेत्राचे अधिकाधिक प्रमाणात यांत्रिकीकरण होणार आहे. याचाच अर्थ भारतातील शेतीक्षेत्रातील विस्थापित श्रमिकांच्या किंवा प्रच्छन्न बेरोजगारांच्या संख्येत वाढ होणार आहे. या

वाढत्या संख्येच्या श्रमिकांना रोजगाराची व उत्पन्नाची साधने पुरविणे जलद गतीने भारताचे औद्योगिकीकरण झाल्यासच शक्य होणार आहे.

(3) **रोजगाराची उपलब्धता :** भारतातील शेतीक्षेत्रात दोन किंवा तीन पीके काढणे, त्यासाठी अधिकाधिक श्रमिकांना रोजगार पुरविणे व अशा रीतीने पिकविलेला जादा शेतमाल विकसित व विकसनशील देशांकडे निर्यात करून त्याच्या मोबदल्यात आवश्यक असलेला औद्योगिक माल आयात करण्याच्या धोरणावर फार मोठ्या मर्यादा पडतात याला अनेक कारणे आहेत.

औद्योगिकदृष्ट्या विकसित देशांत शेतीक्षेत्रही विकसित असल्याचे आढळून येते. त्यामुळे विकसित देशांकडे भारताकडून अधिकाधिक शेतमालाची निर्यात केली जाणे शक्य दिसत नाही.

काही नैसर्गिक शेतमालाऐवजी विकसित देशात कृत्रिम कच्च्या मालाचा अधिकाधिक उपयोग केला जात असल्याचे आढळून येते. उदाहरणार्थ, नैसर्गिक रबराऐवजी कृत्रिम रबर, कापसाच्या धाग्याऐवजी कृत्रिम धागा, शेतमालाचा साठा करण्यासाठी तागाच्या पोत्याऐवजी प्लॅस्टिकच्या पिशव्या व धातूंची पिंपे इत्यादींचा अधिकाधिक वापर केला जात असल्यामुळे, अशा शेतमालाच्या वस्तूंच्या निर्यातीवर भावी काळात अधिकाधिक मर्यादा पडणार आहेत.

भारताकडून (किंवा इतर कोणत्याही देशांकडून) केल्या जाणाऱ्या शेतमालाच्या निर्यातीवर आणखी एक महत्त्वाची मर्यादा पडण्याचे कारण म्हणजे, अन्नधान्यासाठी असणारी मागणी लोकांच्या उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर त्याच प्रमाणात वाढत नसते. याचाच अर्थ शेतमालासाठी असलेली मागणी उत्पन्नाच्या दृष्टिकोनातून सापेक्षतेने अलवचीक असते. या कारणामुळे भारतातील शेतीक्षेत्राची अमर्यादित वाढ करून त्या क्षेत्रात अधिकाधिक श्रमिकांना रोजगार पुरविता येणार नाही; म्हणजेच शेतीक्षेत्रापासून अधिकाधिक लोकांना सततच वाढता रोजगार किंवा उत्पन्न मिळणे शक्य होणार नाही.

(4) **औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनात वाढ :** देश स्वतंत्र होण्यापूर्वी शेतीक्षेत्रातील कच्चा माल इंग्लंड व इतर युरोपमधील देशांकडे पाठवून त्या देशांकडून या कच्चा मालापासून तयार करण्यात येणारा पक्का माल भारत आयात करीत असे. अशा प्रकारे कच्च्या मालाची किंमत आणि पक्क्या मालाची किंमत यांमधील फरक परदेशातील कारखानदार नफ्याच्या स्वरूपात आपल्या पदरात पाडून घेत असत; त्याचप्रमाणे अशा प्रक्रियेमुळे परदेशातील लोकांना रोजगारही उपलब्ध होत असे.

भारतात विविध प्रकारचा औद्योगिक कच्चा माल उपलब्ध असल्यामुळे त्याचे पक्क्या मालात रूपांतर करण्यासाठी भारतात निरनिराळे कारखाने स्थापन करण्याने म्हणजे औद्योगिकीकरण घडवून आणल्याने मोठ्या प्रमाणावर औद्योगिक क्षेत्रात रोजगार उत्पन्न होईल त्याचबरोबर परदेशांत जाणारा फायदा भारतातील लोकांच्याच हाती पडेल त्यामुळे बचत व गुंतवणूक करण्यास व औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन वाढविण्यास अधिकाधिक मदत होईल.

(5) **औद्योगिक प्रगतीस हातभार :** भारतातील फार मोठ्या भागांतील शेतीव्यवसाय अद्याप परंपरागत पद्धतीने केला जात आहे. त्यामुळे भारतातील प्रतिएकरी अन्नधान्याचे व इतर शेतमालांचे उत्पादन विकसित देशांतील दर एकरी उत्पादनाच्या सुमारे 1/3 ते 1/4 इतके कमी आहे.

येथे महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावयाची म्हणजे औद्योगिक क्षेत्र आणि शेतीक्षेत्र यात विरोधाभास आहे अशी समजूत आहे, ती चुकीची आहे. औद्योगिक क्षेत्र आणि शेतीक्षेत्र ही एकमेकांस पूरक क्षेत्रे आहेत.

औद्योगिक क्षेत्रात ट्रॅक्टर, खते, निरनिराळी शेतीची यंत्रे इत्यादींचे उत्पादन झाल्यास व त्याचप्रमाणे यंत्रांच्या मदतीने मोठी-मोठी धरणे बांधून शेतीक्षेत्रास समाधानकारकरीत्या पाण्याचा पुरवठा केला गेल्यास त्यापासून शेतीक्षेत्राचा विकासच होणार असून अन्नधान्याच्या प्रतिएकरी उत्पादनात व त्यामुळे शेतीक्षेत्रात काम करणाऱ्याच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे.

प्रकरण 25

# भारताचे औद्योगिक धोरण

औद्योगिक धोरण या संकल्पनेत लघू , मध्यम व मोठ्या उद्योगांसंबंधीच्या सर्व बाबींचा समावेश होतो. उदाहरणार्थ, देशाच्या अर्थव्यवस्थेतील औद्योगिक क्षेत्रात वार्षिक किती गुंतवणूक राहील, निरनिराळ्या उद्योगांमध्ये किती गुंतवणूक करणे योग्य ठरेल, विविध उद्योगांच्या वार्षिक विकासाचा दर काय असावा, उद्योगांची स्थाननिश्चिती कशी राहील, निरनिराळ्या उद्योगांचे मालकी हक्क कोणाकडे असावेत, निरनिराळे उद्योग स्थापन करण्यासंबंधी व ते चालविण्यासंबंधी कोणते कायदे असावेत, त्याचप्रमाणे औद्योगिक वित्तपुरवठ्यासंबंधी, औद्योगिक क्षेत्रातील कामगारांसंबंधी, औद्योगिक क्षेत्रावरील निरनिराळ्या करांसंबंधीचे प्रश्न इत्यादी व इतर अनेक औद्योगिक बाबींवर विचाराअंती राज्यशासनाकडून जे धोरण आखले व अनुसरले जाते त्याला 'औद्योगिक धोरण' असे म्हणतात. विविध उद्योगांच्या व एकूण औद्योगिक क्षेत्रासंबंधीच्या विविध बाबींवर विचार करून औद्योगिक क्षेत्रासंबंधी जे सर्वसमावेशक असे धोरण ठरविले व अनुसरले जाते त्याला 'औद्योगिक धोरण' असे म्हणतात.

## 25.1 स्वातंत्र्यपूर्व काळातील औद्योगिक धोरण

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, सन 1914 पर्यंत (म्हणजे पहिले महायुद्ध सुरू होईपर्यंत भारत सरकारने (त्या वेळी इंग्लंडचे भारतावर राज्य होते) औद्योगिक क्षेत्रात 'निर्हस्तक्षेपाचे धोरण' अवलंबिले होते. भारतातील औद्योगिक क्षेत्रात ब्रिटिश शासनाने निर्हस्तक्षेपाचे औद्योगिक धोरण अनुसरण्यामागे (म्हणजेच भारतातील निरनिराळ्या उद्योगांच्या स्थापनेस व त्यांचे कार्य सुरळीत चालण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत न करण्याचे धोरण अनुसरण्यामागचा) मुख्य उद्देश म्हणजे अशा निर्हस्तक्षेपाच्या धोरणामुळे इंग्लंडमध्ये सन 1750 ते 1800 च्या दरम्यान जी औद्योगिक क्रांती होऊन जे निरनिराळे उद्योग नव्याने स्थापन झाले होते त्यांच्या वाढीला प्रोत्साहन देणे असा होता.

पहिल्या महायुद्धाच्या काळात (सन 1914-18) ब्रिटिश सरकारच्या औद्योगिक क्षेत्रासंबंधीच्या निर्हस्तक्षेपी धोरणात थोडा बदल झाल्याचे दिसून येते. युद्ध यशस्वी रीतीने लढण्यासाठी भारतात उपलब्ध असलेला औद्योगिक कच्चा माल वापरून औद्योगिक वस्तूंचे व विशेषतः युद्धसाहित्याचे भारतात उत्पादन करण्याची इंग्लंडला पहिल्या प्रदीर्घ महायुद्धामुळे आवश्यकता भासू लागली.

भारताच्या औद्योगिकीकरणाच्या वरील संदर्भात इ. स. 1916 मध्ये 'औद्योगिक आयोग' नेमण्यात आला. त्याचबरोबर 'भारतीय युद्धसाहित्य मंडळ' (Indian Munition Board) इ. स. 1917 मध्ये नेमण्यात आले. या बोर्डाने युद्धास आवश्यक अशा वस्तूंची खरेदी भारतात करावयाचे धोरण अनुसरले. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने भारतातील उद्योजकांना विविध औद्योगिक वस्तूंच्या (विशेषतः इंग्लंडमधील लोकांना पाहिजे असलेल्या) उत्पादनाला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले. या कारणाने पहिल्या महायुद्धाच्या काळात काही आधुनिक उद्योगांची भारतात स्थापना झाली व काही प्रमाणात त्यांचा विकासही झाला.

औद्योगिक आयोगाने आपला अहवाल 1918 साली सरकारला सादर केला. या आयोगाने भारत सरकारने औद्योगिक क्षेत्रातील निर्हस्तक्षेपी धोरणाचा त्याग करावा व भारतात निरनिराळे उद्योग स्थापन होण्याच्या दृष्टीने भारतीय उद्योजकांना निरनिराळ्या तऱ्हेची मदत करावी अशी शिफारस केली. त्याचबरोबर मध्यवर्ती आणि प्रांतीय औद्योगिक खाती स्थापन करावीत अशीही शिफारस औद्योगिक आयोगाने केली.

### भेदात्मक औद्योगिक संरक्षणाचे धोरण

पहिल्या महायुद्धात उद्भवलेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन भारतात बरेच उद्योग सुरू करण्यात आले होते व पूर्वी अस्तित्वात असलेल्या उद्योगांची स्थितीही सुधारली होती. पण पहिले महायुद्ध 1918 साली संपल्यावर तसेच लवकरच

वरील विवेचनावरून असे दिसून येईल की, कै. राजीव गांधी भारताचे पंतप्रधान झाल्यानंतर बरेच उदार औद्योगिक धोरण अनुसरण्यात येत होते उदाहरणार्थ, कालबाह्य झालेले औद्योगिक क्षेत्रातील निर्बंध काढून टाकणे, परवाना पद्धत अधिक शिथिल व सोपी करणे, परवानगीशिवाय स्थापण्यास योग्य अशा उद्योगांची संख्या वाढविणे, उत्पादनाच्या प्रमाणाचे फायदे उपलब्ध करून घेण्याच्या दृष्टीने परवानगीपेक्षा जादा उत्पादन करण्यास परवानगी देणे आणि मक्तेदारी व फेरा कंपन्यांसंबंधी उदार धोरण स्वीकारणे इत्यादी.

## सन 1982 नंतरच्या औद्योगिक धोरणाचे (म्हणजेच नव्या औद्योगिक धोरणाचे) मूल्यमापन

1980 नंतर व विशेषतः 1985 नंतर जे 'नवे' औद्योगिक धोरण अनुसरण्यात येत आहे, ते संसदेत त्यासंबंधी ठराव पास करून किंवा त्यासंबंधी धोरण संसदेत जाहीर करून नव्हे तर हे धोरण हप्त्या-हप्त्याने जुन्या औद्योगिक धोरणात म्हणजेच 1956 च्या औद्योगिक धोरणात बदल घडवून आणून हे नवे औद्योगिक धोरण अनुसरण्यात येत आहे.

हे हप्त्या-हप्त्याने बदल अशा रीतीने घडवून आणण्यात आले हे आपण पाहिले आहे. सारांशरूपाने सांगावयाचे झाल्यास हे बदल पुढील बाबतीत घडवून आणण्यात आले. कंपनीच्या नफ्यावरील करांचे दर कमी करण्यात आले. बऱ्याच वस्तूंवरील उत्पादन कर कमी करण्यात आले. औद्योगिक परवाना पद्धती आणि तिची कार्यपद्धती यांचे सुलभीकरण, खासगी संघटित औद्योगिक क्षेत्रातील कालबाह्य व उत्पादनावर अनिष्ट परिणाम करणाऱ्या नियंत्रणांचे उच्चाटन, 'गाभा' क्षेत्रातील जे उद्योग फक्त सार्वजनिक औद्योगिक क्षेत्रासाठी राखून ठेवले होते त्यात खासगी उद्योगांना प्रवेश देण्याचे धोरण, मक्तेदारी कंपनीच्या व्याख्येत बदल व फार मोठ्या संख्येने औद्योगिक कंपन्यांची मक्तेदारी कायद्याच्या व त्यातील जाचक कलमांतून मुक्तता; आंतरराष्ट्रीय कंपन्या व परदेशी भांडवल भारतात मोठ्या प्रमाणात यावे म्हणून उदार धोरण; बऱ्याच वस्तूंच्या बाबतीत उदार आयात धोरण; भारतातील उद्योगांमधील उत्पादकता, कार्यक्षमता व आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धाशक्ती वाढावी म्हणून उच्चतम प्रतीच्या परकीय तंत्रविद्येच्या आयातीबाबत उदार धोरण, ऊर्जा, वाहतूक व काही संरक्षणविषयक उद्योगांमध्ये खासगी उद्योगांस काही प्रमाणात प्रवेश (म्हणजेच सार्वजनिक क्षेत्रासाठी पूर्णपणे राखून ठेवलेल्या काही उद्योगांमध्ये खासगी उद्योगांना प्रवेश, म्हणजेच काही सार्वजनिक उद्योगांचे 'खासगीकरण'), ज्या वस्तूंचे उत्पादन लघुउद्योग क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात आले होते त्यातील ज्या उद्योगांना आधुनिक तंत्रविद्येची गरज आहे आणि ज्या लघुउद्योगांतील उत्पादनामुळे देशातील गरज संपूर्णपणे भागत नाही त्या लघुउद्योगांमध्ये मोठ्या औद्योगिक कंपन्यांना आणि गृहांना प्रवेश करण्यास परवानगी इत्यादी. या नव्या औद्योगिक धोरणामागील मुख्य उद्देश म्हणजे खासगी संघटित उद्योगांना अधिक वाव व प्रेरणा पुरवून, औद्योगिक विकासाची जी गती सन 1970 नंतर कुंठित झाली आहे तिला चालना देऊन औद्योगिक उत्पादन आणि उत्पादकता वाढविणे व देशातील संरक्षित बाजारपेठेमुळे जो वाढता उत्पादन खर्च व घटती गुणवत्ता अशा कोंडीत भारतीय उद्योग सापडले आहेत, त्यातून त्यांची व देशाच्या अर्थव्यवस्थेची सुटका करणे हे होय.

औद्योगिक क्षेत्रात इ. स. 1982 पासून जे बदल घडवून आणण्यात येत आहेत त्यावर (म्हणजे 'नवीन औद्योगिक धोरणा' वर) खालीलप्रमाणे टीका केली जात आहे. ही टीका विशेषतः डाव्या विचारसरणीच्या लोकांकडून केली जात आहे. टीकाकारांचे मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

1. चालू औद्योगिक धोरण (म्हणजे नवे औद्योगिक धोरण) म्हणजे इ. स. 1956 च्या औद्योगिक धोरणाचा त्याग करण्यासारखेच होय. 1956 च्या औद्योगिक धोरणानुसार 1956 ते 1980 पर्यंत भारताने औद्योगिक वाटचाल केली ते धोरण आता बदलले जात आहे.
2. नवीन औद्योगिक धोरणाने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या विकासाकडे लक्ष न देता त्यांच्या विस्तारावर निर्बंध घातले आहेत. याचाच अर्थ, सार्वजनिक क्षेत्र आता अर्थव्यवस्थेतील प्रमुख उद्योगांवर ताबा ठेवून औद्योगिक क्षेत्राचे नियंत्रण करण्याचे कार्य पूर्वीप्रमाणे करणार नाही. नवीन औद्योगिक धोरण म्हणजे आजपर्यंत विस्तारत आलेले सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग आपली उद्दिष्टे गाठण्यात अयशस्वी झाले आहेत याची कबुलीच होय.
3. नव्या औद्योगिक धोरणाच्या टीकाकारांचे म्हणणे असे आहे की, त्या धोरणामुळे खासगी संघटित क्षेत्रातील बड्या उद्योगपतींचे व मोठ्या उद्योगगृहांचे महत्त्व वाढणार असून खासगी औद्योगिक मक्तेदारीच्या वाढीस चालना मिळणार आहे.

...भर घालणे इत्यादींवर लक्ष केंद्रित करावे, अशा संशोधनाचे फायदे मध्यम प्रतीच्या व लघुउद्योगांना प्राप्त ...होण्यावर भर देण्यात आला.

(8) **आधुनिकीकरण** : सन 1980 च्या औद्योगिक धोरणात असे ठरविले की, प्रत्येक उद्योगाला योग्य अशा ... आधुनिकीकरण घडवून आणण्याच्या दृष्टीने 'आधुनिकीकरण संच' तयार करावा. अशा आधुनिकीकरण संचात ...बाबींचा समावेश असावा असे सुचविण्यात आले. उद्योगांसाठी योग्य अशा जागेची निवड, ऊर्जेचा अत्यंत कार्यक्षम ... योग्य अशा उत्पादन तंत्राचा वापर व योग्य असे उत्पादन प्रमाण ठरविणे इत्यादी. अशा रीतीने करण्यात येणाऱ्या ...औद्योगिक आधुनिकीकरणाचे उद्देश म्हणजे उत्पादकता वाढविणे, कार्यक्षमतेत वाढ घडवून आणणे, उत्पादन खर्च कमी ... पुनर्निर्माण न करता येण्याजोग्या ऊर्जेचा कमीत-कमी वापर करणे इत्यादी व अशा तऱ्हेच्या आधुनिकीकरणाची ... मोठ्या उद्योगांमध्ये होत असली तरी ती प्रक्रिया मध्यम व लघुउद्योगांपर्यंत पोहोचावी अशी 1980 च्या धोरणाची ...अपेक्षा होती.

(9) **नैसर्गिक वातावरणातील समतोल राखणे** : विकसित व त्याचप्रमाणे विकसनशील देशांत नैसर्गिक ...वातावरणातील समतोल राखण्याकडे अधिकाधिक लक्ष पुरविले जात आहे व असे लक्ष पुरविले गेले पाहिजे हे लक्षात ...सन 1980 च्या औद्योगिक धोरणाने ठरविले की, यापुढे मोठ्या शहरांमध्ये मोठ्या उद्योगांना स्थान न देता व अशा ...उद्योगांचे कोणत्याही विशिष्ट ठिकाणी केंद्रीकरण होऊ न देता, देशात उद्योगांचे जास्तीत जास्त विकेंद्रीकरण केले जाणे ...आवश्यक आहे व त्या दृष्टीने धोरण ठरविले गेले पाहिजे व पावले उचलली गेली पाहिजेत.

## सन 1980 च्या औद्योगिक धोरणाचे मूल्यमापन

...गेल्या बऱ्याच वर्षांत सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचा विचार करता, सर्वसाधारणपणे अकार्यक्षमता, वर्षानुवर्षे चालत ...आलेले त्या क्षेत्रातील प्रचंड वित्तीय नुकसान, साधनसामग्रीचा प्रचंड प्रमाणावर होणारा अपव्यय, इतर अनेक त्रुटी इत्यादी ...असमाधानकारक बाबींमुळे, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग हे उद्योग क्षेत्र व भारताची अर्थव्यवस्था ऊर्जितावस्थेला आणण्याचे ...प्रमुख व महत्त्वाचे साधन आहे, या गृहीतांवरील लोकांचा विश्वास उडून गेल्याचे आढळते. 1980 च्या औद्योगिक ...धोरणाने या सर्व त्रुटी व असमाधानकारक बाबी मान्य करून त्या त्रुटी दूर करून व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे कार्यक्षम ... कार्य करून लोकांचा विश्वास संपादन करण्याच्या दृष्टीने अनेक उपाययोजना सुचविल्या. खरे म्हणजे हे सर्व या ... अभ्यास पाहिजे होते पण तसे झाले नाही. 1980 च्या धोरणाने या बाबतीत अस्तित्वात असलेली परिस्थिती ...करून ती सुधारण्यासाठी व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने काही निश्चित स्वरूपाची पावले ...उचलण्याचे ठरविले.

...भारताच्या औद्योगिकीकरणाच्या वाटेतील दुसरी महत्त्वाची अडचण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील निरनिराळ्या ... (उदाहरणार्थ, वीज, कोळसा, रस्तावाहतूक, रेल्वेसेवा, पाणी, जलवाहतूक इत्यादी) पुरविल्या जाणाऱ्या व ...औद्योगिकीकरणास अत्यावश्यक असणाऱ्या सेवांच्या पुरवठ्यासंबंधीची असमाधानकारक परिस्थिती. 1980 च्या धोरणाने ...सुविधांच्या पुरवठ्यात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने अनेक उपाय सुचविले.

...सन 1980 च्या औद्योगिक धोरणाने लघुउद्योग, कुटीरोद्योग व साहाय्यक उद्योग यांच्यामधील गुंतवणुकीची मर्यादा ... योग्य पाऊल उचलले आहे. कारण कच्चा मालांच्या, जमिनींच्या व यंत्रांच्या किमतीत अलीकडील एक-दोन ... प्रचंड वाढ झाली असल्याने पूर्वी निर्धारित केलेल्या गुंतवणूक सीमेला फारसा अर्थ राहिला नव्हता, पण या ... एक भीती व्यक्त करणे जरुरीचे आहे की, नव्याने वाढवून दिलेली गुंतवणूक रक्कम उभी करणे बऱ्याच ...उद्योजकांना शक्य होईलसे वाटत नाही त्याचबरोबर बडे उद्योजक बिनामी किंवा आप्तेष्टांच्या नावाने लघुउद्योग क्षेत्रात ...साहाय्यक उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर शिरण्याची शक्यता विचारात घ्यावी लागेल.

...कायद्याने परवानगी दिल्यापेक्षा अधिक अशा स्थापित उत्पादन क्षमतेला व भावी काळातील अधिक उत्पादनाला ...कायदेशीर संमती देऊन वस्तूंच्या वाढीस प्रोत्साहन दिले हे एका दृष्टीने योग्यच झाले. कारण बऱ्याच काळपर्यंत ... विकसनशील देश आहे की, जेथे अधिक उत्पादनाबद्दल शिक्षा केली ... कायदेशीररीत्या मंजुरी देण्यात एक मोठा धोका

देशाच्या हिताच्या दृष्टीने व त्या दोघांचे योग्य प्रकारे नियंत्रण करणे आवश्यक असल्याचे ठरावात म्हटले आहे. परकीय भांडवल व परकीय तंत्रज्ञ ज्या उद्योगांमध्ये प्रवेश करतील त्या कारखान्यांच्या मालकी हक्कात व कार्यवाहीत भारतीयांचा प्रमुख हिस्सा राहील हे स्पष्ट करण्यात आले. परकीय तंत्रज्ञांनी भारतीय कामगारांना प्रशिक्षण देऊन शेवटी भारतीय तंत्रज्ञांना परकीय तंत्रज्ञांची जागा द्यावी असे 1948 च्या ठरावात नमूद करण्यात आले.

## इ. स. 1948 च्या औद्योगिक धोरणाचे मूल्यमापन

इ. स. 1948 च्या औद्योगिक धोरणाने खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रात कोणकोणते उद्योग राहतील हे स्पष्ट केले. त्यामुळे खासगी उद्योजकांच्या मनात उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणासंबंधी जे संशयाचे वातावरण पसरले होते ते काही प्रमाणात दूर झाले. तसेच 1948 च्या औद्योगिक धोरणाने परकीय भांडवलाचे भारताच्या औद्योगिक विकासात काय स्थान राहील यासंबंधी पूर्वग्रहदूषित विचार न करता परकीय भांडवलाला व तंत्रज्ञांना भारताच्या औद्योगिक विकासात योग्य ते स्थान दिले. पण त्यांच्यावर भारतीयांचे योग्य ते नियंत्रण राहील याची काळजी घेतली ते योग्यच झाले. त्याचप्रमाणे मालक-कामगारांसंबंधी सरकारने समाधानकारक भूमिका घेतल्याचे स्पष्ट होते व कामगारांना औद्योगिक व्यवस्थापनात सहभागी करून घेण्यावर व मालक-मजूर यांचे संबंध सलोख्याचे राहावेत यावर भर दिला हे योग्यच झाले.

उद्योगांचे वर्गीकरण करताना पहिल्या वर्गात शस्त्रनिर्मिती, दारूगोळा, अणुशक्ती, रेल्वेवाहतूक इत्यादी उद्योगांमध्ये मध्यवर्ती सरकारची मक्तेदारी राहावी हे राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने योग्य होय. पण युद्धोपयोगी शस्त्रांची निर्मिती करताना (उदाहरणार्थ, ट्रक, जीप, शस्त्रास्त्रांचे सुटे भाग इत्यादी) नंतरच्या काळात खासगी क्षेत्राकडून करवून घेण्यात येत आहेत व देशाच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेल्या शस्त्रास्त्रांच्या व दारूगोळ्यांच्या उत्पादनात व विशेषतः देशाच्या संरक्षणासाठी ज्या हजारो वस्तू लागतात त्यांपैकी काही वस्तूंचे उत्पादन खासगी क्षेत्राकडून करवून घेणे फायद्याचे आहे ही गोष्ट 1948 चे धोरण ठरविताना दुर्लक्षिली गेल्याचे दिसून येते. असे बदल आता केले जात आहेत व ते योग्यच आहेत.

औद्योगिक क्षेत्रात खासगी उद्योगांना स्थान दिले जावे असे जरी मान्य केले गेले तरी दुसऱ्या व तिसऱ्या गटांतील उद्योगांवर इतके निर्बंध लादले गेले की त्यामुळे खासगी उद्योगांच्या विकासात अडथळे निर्माण झाले. भारत सरकारने दुसऱ्या व तिसऱ्या गटांतील उद्योगांवर नियंत्रणाचे जे अधिकार आपल्या हाती राखून ठेवले होते त्याचा गैरवापर केला गेला व त्याचा प्रतिकूल परिणाम खासगी क्षेत्रातील उद्योगांच्या विकासावर झाला. इ. स. 1980 नंतर बरीच नियंत्रणे रद्द करण्यात येत आहेत व परवाना पद्धती सोपी करण्यात येत आहे. याचाच अर्थ 1948 चे धोरण आखताना भारत सरकारने खासगी उद्योगांसंबंधी योग्य अशी भूमिका घेतली नाही व त्यांच्याकडे पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनातून पाहिले असे दिसून येते.

1948 च्या ठरावाने उद्योगांची सार्वजनिक व खासगी क्षेत्रात विभागणी केली तरी अमुक-अमुक उद्योग खासगी क्षेत्रात राहावेत याचा कोठेही स्पष्ट उल्लेख केल्याचे आढळत नाही. सार्वजनिक क्षेत्रातील व खासगी क्षेत्रातील उद्योग एकमेकांस पूरक आहेत म्हणून सार्वजनिक उद्योगांबरोबरच खासगी उद्योगांच्या विकासाच्या दृष्टीने त्यांना अधिकाधिक वाव देणे आवश्यक आहे याची जाणीव 1948 च्या धोरणात स्पष्ट होत नाही. मिश्र अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट स्वीकारले गेले तरी खासगी क्षेत्रातील उद्योगांकडे सापत्नभावाने पाहिले गेले अशी त्या क्षेत्रातील उद्योजकांची भावना झाली. खासगी उद्योगांवर अनेक नियंत्रणे लादली गेली तरी भावी काळात त्या क्षेत्राने प्रचंड प्रगती केली हे विसरून चालणार नाही. खासगी क्षेत्रातील उद्योगांकडे पाहण्याचा दृष्टिकोन 1980 नंतर बदलत असल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय भांडवलाने सर्वसाधारणपणे भारताच्या आर्थिक व राजकीय हिताच्या दृष्टीने विरुद्ध भूमिका घेतली होती. पण 1948 च्या धोरणाने पूर्वग्रह सोडून व वस्तुनिष्ठ धोरण स्वीकारून परकीय भांडवलाच्या व तंत्रज्ञानाच्या बाबतीत योग्य धोरण स्वीकारल्याचे दिसून येते.

मालक व कामगार यांच्यामध्ये संबंध स्थापून कामगारांना उद्योगांच्या व्यवस्थापनात सहभागी करून घेण्याचे उद्दिष्ट योग्य होय. पण हे उद्दिष्ट [illegible] [illegible] साध्य करून घ्यावयाचे या बाबतीत शासनाला अद्याप (1988 मध्येही) यश

इ. स. 1948 च्या औद्योगिक धोरणावर टीका करताना असे दर्शविले जाते की, त्या धोरणामध्ये उद्योगांचा विकास घडवून आणताना कोणकोणत्या उद्योगांना कोणकोणते स्थान द्यावयाचे, कोणत्या उद्योगांना अग्रक्रम द्यावयाचे व कोणत्या उद्योगांना दुय्यम स्थान द्यावयाचे हे निश्चितपणे सांगितले गेले नाही व ज्या काही उद्योगांच्या बाबतीत असा क्रम ठरवून दिला गेला तो पाळण्यात आला नाही. उदाहरणार्थ, साधनसामग्रीची टंचाई असूनही काही घटकराज्यांनी मोटार वाहतुकीच्या व्यवसायाच्या राष्ट्रीयीकरणावर भर दिला व उत्तर प्रदेश सरकारने रेयॉनची गिरणी सुरू करण्याचे ठरविले. याचाच अर्थ विविध उद्योगांचा विकास घडवून आणताना कोणता क्रम अनुसरावयाचा याचा 1948 च्या धोरणात स्पष्ट उल्लेख केला गेला नाही. काही उद्योगांच्या बाबतीत सरकारने टोकाचे धोरण स्वीकारले. उदाहरणार्थ, पोलादाचे जादा उत्पादन फक्त सार्वजनिक उद्योगातच केले जावे अशी भूमिका स्वीकारल्यामुळे पहिल्या योजनेच्या काळात पोलादाचे उत्पादन विशेष वाढू शकले नाही.

लघुउद्योगांना व कुटीरोद्योगांना अधिक महत्त्वाचे स्थान 1948 च्या धोरणात द्यावयास पाहिजे होते.

इ. स. 1948 च्या औद्योगिक धोरणात काही त्रुटी असल्या तरी स्वातंत्र्यापूर्वीच्या काळातील पूर्वग्रह व निरनिराळ्या वर्गांना दिलेली आश्वासने, देशाच्या विभाजनामुळे निर्माण झालेली गोंधळाची परिस्थिती, औद्योगिक क्षेत्रातील राजकीय नेत्यांमध्ये औद्योगिक क्षेत्राच्या बाबतीतील अनुभवाचा अभाव व औद्योगिक क्षेत्रातील विविध प्रचंड व गुंतागुंतीचे स्वरूप या गोष्टी विचारात घेतल्या आणि भारताच्या औद्योगिक धोरणाच्या विकासातील पहिली पायरी या दृष्टीने 1948 च्या औद्योगिक धोरणविषयक ठरावाकडे पाहिले तर ते सर्वसाधारणपणे समाधानकारक होते असे म्हणावयास हरकत नसावी.

## 25.4 1956 चा औद्योगिक धोरणविषयक ठराव

सन 1948 चा औद्योगिक धोरणविषयक ठराव पास झाल्यानंतरच्या काही वर्षांमध्ये बऱ्याच महत्त्वाच्या घटना घडून आल्या.

सन 1950 नंतर भारतात आर्थिक नियोजनाचे युग सुरू झाले. 1950 साली भारतीय घटना तयार होऊन तिचा स्वीकार करण्यात आला. पहिली पंचवार्षिक योजना सर्वसाधारणपणे यशस्वी झाली होती. भारताच्या विभाजनामुळे जे गंभीर प्रश्न निर्माण झाले होते ते काही प्रमाणात सोडविण्यात भारताला यश आले होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेतीक्षेत्रास अग्रस्थान देण्यात आले व पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस (म्हणजेच सन 1956 मध्ये) शेतीक्षेत्रातील ठरविलेली उद्दिष्टे गाठण्यात यश आले होते. अन्नधान्याचा प्रश्न थोड्याफार यशस्वी रीतीने सोडविला गेला असे मानण्यात आले. 1951 च्या मानाने 1956 साली सर्वसाधारणपणे किंमतपातळी खाली आली होती. सन 1950 मध्ये स्वीकारलेल्या भारताच्या राज्यघटनेत काही आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे स्वीकारण्यात आली होती. आवडी येथील ठरावानुसार भारतात समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट स्वीकारण्यात आले व ते उद्दिष्ट साध्य करून घेण्याच्या दृष्टिकोनातून आर्थिक व औद्योगिक धोरणाची आखणी करण्यात यावी असे निश्चित करण्यात आले. 1956 साली पहिली योजना संपून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची कार्यवाही सुरू व्हावयाची होती.

सन 1956 मध्ये दुसरी पंचवार्षिक योजना (1956-1961) सुरू व्हावयाची असल्याकारणाने उद्योगांच्या विकासासंबंधीची काही धोरणे व उद्दिष्टे नव्याने मांडण्याची जरुरी होती.

वार्षिक वृद्धिदर वाढविणे, औद्योगिकीकरणाच्या गतीला चालना देणे, विशेषतः अवजड आणि यंत्रसामग्रीचे उत्पादन करणारे उद्योग स्थापणे, सार्वजनिक क्षेत्राची वाढ करणे, खासगी मक्तेदारीस आळा घालणे, संपत्तीच्या आणि उत्पन्नाच्या वाटपातील आत्यंतिक विषमता कमी करणे, आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रात विकेंद्रीकरण घडवून आणणे आणि औद्योगिकीकरणाकडे जलद वाटचाल करणे ही सर्व उद्दिष्टे गाठण्याच्या दृष्टीने 1948 च्या औद्योगिक धोरणाचा पुनर्विचार करून 1956 चा औद्योगिक धोरणविषयक ठराव स्वीकारण्यात आला.

### सन 1956 चा औद्योगिक धोरणविषयक ठराव

सन 1956 च्या औद्योगिक धोरणविषयक ठरावाने उद्योगांचे नव्याने वर्गीकरण करण्यात आले. हे नवे वर्गीकरण 1948 च्या वर्गीकरणाशी मिळतेजुळते असले तरी नवीन वर्गीकरणानुसार औद्योगिक क्षेत्रात राज्यसंस्थेचे सार्वजनिक क्षेत्र अधिक व्यापक करण्यात आले.

## 23.3 आधुनिक उद्योगांची भारतात सुरुवात

1853 साली भारतात रेल्वेयुगाची सुरुवात झाली व त्याच वेळी लॉर्ड डलहौसीने सार्वजनिक बांधणी खात्याकडे भारतातील रस्ते बांधण्याचे काम सोपविले. त्यामुळे काही प्रमाणात तरी रेल्वे इंजिने दुरुस्तीचे व त्यांच्या सुट्या भागांच्या निर्मितीच्या अभियांत्रिकी उद्योगाची भारतात सुरुवात होणे अपरिहार्य होते. पण महादेव गोविंद रानडे यांनी म्हटल्याप्रमाणे सन 1890 नंतरच भारतात उद्योगांची सुरुवात झाली असे म्हणणे योग्य होईल. याच काळात भारतात कापड आणि ताग उद्योगांचा पाया घातला गेला. पण भारतात भरपूर प्रमाणात औद्योगिक कच्चा माल, श्रमिक व त्याचप्रमाणे बाजारपेठ उपलब्ध असूनही ब्रिटिश सरकारच्या निर्हस्तक्षेपी धोरणामुळे पहिल्या महायुद्धाच्या काळापर्यंत भारतातील औद्योगिक प्रगती निराशाजनक होती असे म्हणावे लागेल.

पहिल्या महायुद्धाच्या काळात (1914-18) इंग्लंड आणि युरोपामधील इतर देशांकडून (विशेषत: जर्मनीकडून) औद्योगिक वस्तूंची आयात थांबल्यामुळे आधुनिक उद्योगांच्या विकासाला भारतात अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. इंग्लंडही चार वर्षे युद्धात गुंतल्याने, त्या देशासही भारताकडून औद्योगिक वस्तूंचा पुरवठा झाल्यास तो पाहिजेच होता. भारतात कोणकोणते उद्योग सुरू करता येतील व इतर संबंधित बाबींचा विचार करण्यासाठी 1916 साली 'औद्योगिक आयोग' नेमण्यात आला. त्या आयोगाने भारतातील औद्योगिकीकरणाच्या आवश्यकतेची व त्याच्या शक्यतेसंबंधी अनुकूल असा अहवाल ब्रिटिश सरकारकडे सादर केला.

वरील कारणांमुळे पहिल्या महायुद्धाच्या काळात काही उद्योग (लोखंड व पोलाद, सुती कापड, तागाचा माल, सिमेंट, कागद, काड्याच्या पेट्या इत्यादी) प्रस्थापित झाले व थोड्याफार प्रमाणात त्यांचा विस्तार घडून आला.

पहिले महायुद्ध 1918 साली संपल्यावर काही वर्षांतच इंग्लंड, जर्मनी व युरोपमधील इतर देशांनी आपली युद्धामुळे विस्कटलेली औद्योगिक अर्थव्यवस्था पुन: प्रस्थापित केली व सन 1920 नंतर इंग्लंड व युरोपमधील इतर देशांकडून औद्योगिक मालाची मोठ्या प्रमाणावर भारतात आयात सुरू झाली. त्यामुळे पहिल्या महायुद्धाच्या काळात जे उद्योग स्थापण्यात आले होते व ज्यांनी युद्धजन्य परिस्थितीचा फायदा घेऊन आपला थोडाफार प्रमाणावर विकास घडवून आणला होता ते अडचणीत आले; कारण युरोपमधील देशांकडून भारतात येणाऱ्या औद्योगिक मालांशी यशस्वी रीतीने स्पर्धा करणे भारतीय उद्योगांना शक्यच नव्हते.

वरील कारणांमुळे भारतीय उद्योगांनी आपणास संरक्षण मिळावे अशी मागणी सुरू केली. त्याचा थोडाफार परिणाम होऊन सन 1922 नंतर भारतीय उद्योगांच्या बाबतीत 'भेदात्मक संरक्षणाचे धोरण' स्वीकारण्यात आले. त्या धोरणात बऱ्याच त्रुटी असूनही औद्योगिक संरक्षणविषयक धोरणामुळे लोखंड व पोलाद, कापड, साखर, काड्यापेट्या आणि कागद इत्यादी उद्योगांचा विकास होण्यास काही प्रमाणात मदत झाली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात (1939-45) इंग्लंड व युरोपमधील इतर देशांकडून व त्याचप्रमाणे जपानकडून केल्या जाणाऱ्या औद्योगिक वस्तूंची भारतातील आयात संपूर्णपणे थांबली व या युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतातील विविध उद्योगांच्या विकासाला अनुकूल अशी परिस्थिती निर्माण झाली. इंग्लंडही दीर्घकाळ युद्धात गुंतल्यामुळे शस्त्रास्त्रे व दारूगोळा इत्यादी संरक्षणविषयक मालांच्या उत्पादनावरच त्या देशाला आपले लक्ष केंद्रित करावे लागले. युद्धजन्य परिस्थितीमुळे ब्रिटिश सरकारनेही आपल्या हिताच्या दृष्टीने भारतातील विविध उद्योगांच्या विकासाला मदत करण्याचे धोरण स्वीकारले. वरील कारणांमुळे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात (1939-45) भारतातील विविध उद्योगांच्या विकासाला अनुकूल परिस्थिती प्राप्त झाली. जुन्या व नव्याने प्रस्थापित झालेल्या उद्योगांचा विकास घडून आला. कापड, ताग, साखर तसेच कागद, सिमेंट, अभियांत्रिकी व रासायनिक उद्योगांचा (दुसऱ्या महायुद्धाच्या काळात) बऱ्याच मोठ्या प्रमाणावर विकास घडून आला.

वरील ऐतिहासिक पार्श्वभूमीवर स्वातंत्र्योत्तर काळात विविध उद्योगांचा भारतात विकास कसा घडून आला, हे अभ्यासणे उद्बोधक ठरेल.

प्रकरण 23

# भारताच्या आधुनिक औद्योगिकीकरणाची पार्श्वभूमी

## (ब्रिटिशपूर्व काळापासून भारत स्वतंत्र होईपर्यंत)

## 23.1 ब्रिटिशपूर्व काळातील भारतातील औद्योगिक भरभराट

भारताच्या आधुनिक औद्योगिकीकरणाचे (म्हणजेच भारताला 1947 साली स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यानंतरचे) विविध प्रश्न समाधानकारकरीत्या समजावून घेण्याच्या दृष्टीने ब्रिटिशपूर्व काळापासून ते भारत स्वतंत्र होईपर्यंतच्या काळात भारताच्या औद्योगिक क्षेत्रातील घडामोडींची माहिती असणे आवश्यक आहे.

फार प्राचीन काळापासून भारतात विविध उद्योगांचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला होता. हजारो वर्षांपूर्वीपासून भारतात तयार होणाऱ्या मलमली कापडाची ख्याती जगभर पसरली होती. डाक्का मलमल या नावाने प्रसिद्ध असणारी ही मलमल भारतातील बऱ्याच ठिकाणी तयार केली जात होती.

सुती कापडाबरोबरच रेशमी व लोकरीच्या कपड्यांसाठी फार पूर्वीपासून भारत प्रसिद्ध होता. शाल, पैठणी, शेले, दुपट्टे इत्यादींचे उत्पादन भारतात बऱ्याच ठिकाणी मोठ्या प्रमाणात होत असे व त्यांची युरोप व आशिया खंडांतील निरनिराळ्या देशांकडे नियमितपणे निर्यात होत असल्याचे आढळते.

सुती, रेशमी व लोकरी कापडांच्या उद्योगांबरोबरच भारतात शेकडो वर्षांपासून विविध उद्योग ऊर्जितावस्थेत असल्याचे आढळते. उदाहरणार्थ, सोन्या-चांदीचे दागदागिने व जडजवाहीर यांचे भारतातील हस्तोद्योगांत मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असे. त्याचप्रमाणे तांब्या-पितळेची भांडी, इतर धातूंच्या विविध वस्तू, हस्तिदंती, लाकडी व विविध धातूंपासून तयार केलेल्या कोरीव वस्तूंविषयी भारत फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध असल्याचे आढळते. हे हस्तोद्योग शहरी व ग्रामीण भागात अस्तित्वात होते व त्यांची भरभराट होत असल्याचे आढळते. त्याचप्रमाणे काचेचे सामान, निरनिराळ्या धातूंची खेळणी वगैरे वस्तू भारतात मोठ्या प्रमाणावर तयार होत असत. राजे व निरनिराळ्या संस्थानिकांच्या मालकीच्या म्हणजे सरकारी कारखान्यांमधून निरनिराळ्या प्रकारच्या शस्त्रास्त्रांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असे. जहाजबांधणी उद्योगांबाबतही भारत प्रसिद्ध होता.

ईस्ट इंडिया कंपनी 1609 साली भारतात प्रथम आली व तिने भारताच्या युरोपशी चाललेल्या व्यापारात भाग घेण्यास सुरुवात केली. ईस्ट इंडिया कंपनीचा उद्देश भारतात तयार होणारा औद्योगिक माल युरोपमधील निरनिराळ्या देशांत निर्यात करून त्या व्यापारातून नफा मिळवावयाचा होता. त्यावरून ब्रिटिश लोक भारतात येण्यापूर्वी व आपले राज्य प्रस्थापित करण्यापूर्वी भारताने औद्योगिक क्षेत्रात किती प्रगती केली होती हे स्पष्ट होते.

## 23.2 भारताच्या औद्योगिक ऱ्हासाची कारणे

इंग्लंडमध्ये 18 व्या शतकाच्या मध्यात औद्योगिक क्रांती झाली व त्याचबरोबर 1818 साली इंग्लंडने भारतावर आपले स्वामित्व प्रस्थापित केले. सुमारे 18 व्या शतकाच्या मध्यापासून निरनिराळ्या कारणांमुळे पण प्रामुख्याने वरील दोन घटनांमुळे भारतातील उद्योगांच्या ओहोटीला सुरुवात झाली व काही काळानंतर झपाट्याने भारतातील उद्योग नष्ट होऊन भारत लवकरच शेतीप्रधान देश बनला.

4. उदार आयात धोरणामुळे भारतातील भांडवली उद्योगावर अनिष्ट परिणाम होणार आहे. याचे कारण भारतीय यंत्रसामग्री विकसित देशातील यंत्रसामग्रीशी यशस्वी स्पर्धा करू शकणार नाही. त्यामुळे देशी भांडवली उद्योगांच्या विकासाला खीळ बसेल व त्या उद्योगांतील बेकारांच्या संख्येत वाढ होईल. (छोट्या डिझेल इंजिनाच्या बाबतीत हा अनुभव ताबडतोब आला.)
5. नव्या औद्योगिक धोरणामुळे लघुउद्योग क्षेत्रातील काही उद्योगांमध्ये बड्या औद्योगिक कंपन्यांना प्रवेश दिला गेल्याकारणाने बरेच दुष्परिणाम संभवतात. उदाहरणार्थ, खऱ्या अर्थाने जे लघुउद्योग व लघुउद्योजक आहेत त्यांचा विकास खुंटणे, औद्योगिक विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होणे आणि अधिकाधिक लघुउद्योगांमधील उत्पादनसंस्थांमध्ये आजारपण पसरणे इत्यादी.
6. नव्या औद्योगिक धोरणामुळे औद्योगिक वाढीचा दर वाढण्याची शक्यता आहे व तो वाढेलही पण त्याचबरोबर उत्पन्नाच्या व संपत्तीच्या वाटपातील विषमता वाढणार आहे हे निश्चित. टीकाकारांच्या मते अलीकडील काही वर्षांत लोकसभेत व राज्यसभेत 'समाजवाद' व 'समाजवादी समाजरचना' हे शब्द ऐकू येईनासे झाले आहेत.
7. प्रो. के. एन. राज यांच्या मते परदेशी कंपन्या व परकीय भांडवल यांना जवळजवळ मुक्तद्वार दिले गेल्याकारणाने त्याचे भारताच्या आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याच्या संदर्भात फार मोठे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे.

## 25.9 सन 1991 चे औद्योगिक धोरण

काँग्रेस सरकारने आपले नवे औद्योगिक धोरण 24 जुलै, 1991 रोजी जाहीर केले.

या नव्या औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये समजून घेण्यासाठी तोपर्यंतच्या औद्योगिक धोरणांची पार्श्वभूमी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

भारत सन 1947 मध्ये स्वतंत्र झाल्यावर भारत सरकारने सन 1948 मध्ये आपले औद्योगिक धोरण जाहीर केले. नंतर पंडित जवाहरलाल नेहरूंच्या विचारास अनुसरून सन 1956 मध्ये पुनः औद्योगिक धोरणाची मांडणी करण्यात आली. या सन 1956 च्या औद्योगिक धोरणात परिशिष्ट 'अ' मध्ये कोणते उद्योग सरकार काढू शकते याची यादी होती व परिशिष्ट 'ब' मध्ये कोणते उद्योग मुख्यतः सरकार काढू शकते व ज्या उद्योगांमध्ये खासगी औद्योगिक क्षेत्रासही वाव आहे त्यांची यादी होती. परिशिष्ट 'क' मध्ये परिशिष्टे 'अ' आणि 'ब' मध्ये अंतर्भाव नसलेल्या बाकी सर्व उद्योगांचा समावेश करण्यात आला होता आणि परिशिष्ट 'क' मधील उद्योग खासगी औद्योगिक क्षेत्राकडे सोपविण्याचे ठरविण्यात आले होते. ... आवश्यक वाटल्यास 'क' परिशिष्टातील उद्योगांमध्येही सरकार प्रवेश करू शकते अशी पुस्ती जोडण्यात आली होती.

सन 1977 आणि सन 1980 मध्ये या धोरणात काही बदल करण्यात आले; पण सन 1956 च्या औद्योगिक धोरणाची मूलभूत चौकट मात्र तशीच राखण्यात आली होती. सन 1977 मध्ये जनता सरकारने लघुउद्योगांना अधिक महत्त्वाचे स्थान व औद्योगिक विकेंद्रीकरण यावर भर दिला.

सन 1980 मधील राजीव गांधींच्या सरकारने देशांतर्गत औद्योगिक स्पर्धा वाढविणे, आधुनिकीकरणास उत्तेजन देणे, परकीय भांडवल गुंतवणुकीस अधिक वाव देणे, देशातील उद्योगांची निर्यातक्षमता वाढविणे इत्यादी बाबतीत महत्त्वाचे निर्णय घेतले, त्याचप्रमाणे औद्योगिक परवाना पद्धतीतील दिरंगाई कमी करणे, संगणक इत्यादी आधुनिक उद्योगांची वाढ घडवून आणणे, औद्योगिक क्षेत्रातील खासगी उद्योगांना अधिक वाव देणे यावर भर दिला. असे असले तरी सन 1980 च्या औद्योगिक धोरणाने सन 1956 च्या औद्योगिक चौकटीत मूलभूत बदल घडवून आणले असे म्हणता येणार नाही.

### सन 1991 च्या औद्योगिक धोरणाची रूपरेषा

... 1991 च्या औद्योगिक धोरणाने सन 1956 च्या औद्योगिक धोरणाच्या मूलभूत चौकटीत महत्त्वाचे बदल घडवून ... असे मानण्यास वाव आहे. उदाहरणार्थ, अनेक महत्त्वाच्या उद्योगांमध्ये सरकारची मक्तेदारी कमी करून ... शासनाच्या औद्योगिक क्षेत्रातील परवाना पद्धतीचे अवडंबर कमी ... निर्णय घेण्यात आले आहेत. या गोष्टी

आहे हे मान्य करावयास पाहिजे. अशा तऱ्हेचे धोरण म्हणजे जे बेकायदेशीरपणे वागले व बराच काळपर्यंत वागत आले त्यांनी प्रचंड फायदा करून घेतला व ज्यांची वागणूक प्रामाणिकपणाची होती अशांना त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल पश्चात्ताप करण्याची पाळी आली.

सन 1980 मध्ये केल्याप्रमाणे परवान्यापेक्षा जास्त स्थापित उत्पादन क्षमतेस कायदेशीर स्वरूप देण्याची शक्यता भावी काळातही आहे असा उद्योजकांचा समज 1980 च्या या बाबतीतील धोरणामुळे झाला तर उद्योजक जाणूनबुजून परवान्यापेक्षा अधिक स्थापित उत्पादन क्षमता निर्माण करण्याचा प्रयत्न करतील. असे केल्याने औद्योगिक परवाना-पद्धतीस व त्या तत्त्वास काहीही अर्थ उरणार नाही व त्याचप्रमाणे 'औद्योगिक नियोजन' हे नियोजनच राहणार नाही हे लक्षात घ्यावयास पाहिजे. 1980 चे औद्योगिक धोरण अशी विचित्र परिस्थिती निर्माण करण्यास कारणीभूत झाले. निदान परवान्याव्यतिरिक्त स्थापित उत्पादन क्षमतेस मान्यता देताना अशी मान्यता फक्त महत्त्वाच्या उद्योगांच्या बाबतीतच दिली जाते व चैनीच्या व निम-चैनीच्या वस्तूंच्या बाबतीत तशी परवानगी दिली जाणार नाही, निदान एवढे तरी सरकारने करणे आवश्यक होते.

सन 1980 च्या औद्योगिक धोरणात काही चांगल्या योजना आहेत. उदाहरणार्थ, उद्योगांचे आधुनिकीकरण, उद्योगांना आवश्यक असणाऱ्या सोई-सुविधात वाढ घडवून आणण्यासाठी योजना, ऊर्जेसंबंधीचे धोरण, औद्योगिक क्षेत्रात, 'संशोधन आणि विकास' (R & D) यात प्रगती घडवून आणण्यासाठी योजलेले उपाय, परवाना पद्धत सोपी करण्याचे धोरण, देशात स्वायत्त संघटनेच्या स्वरूपाच्या उद्योग क्षेत्राची रचना (Industrial Federalism) अस्तित्वात आणणे, नैसर्गिक वातावरणातील समतोल राखणे इत्यादी.

सन 1980 च्या औद्योगिक धोरणासंबंधी मूलभूत प्रश्न उपस्थित होतो तो हा की, त्या औद्योगिक धोरणाची कार्यवाही कितपत कार्यक्षमतेने होणार आहे ? सन 1951 पासून बऱ्याच चांगल्या धोरणांच्या घोषणा वेळोवेळी केल्या गेल्या पण त्यांची कार्यवाही समाधानकारकरीत्या झाली नाही. 1980 चे धोरण जाहीर करून दशकाहून अधिक काळ गेला तरी सार्वजनिक उद्योगातील कार्यक्षमता वाढल्याचे चिन्ह दिसत नाही उद्योगांना आवश्यक असणाऱ्या सोई-सुविधांच्या पुरवठ्यात लक्षणीय वाढ व सुधारणा झाल्याची चिन्हे दिसत नाहीत. ऊर्जेची समस्या पूर्वीइतकीच गंभीर राहिलेली आहे. औद्योगिक क्षेत्रातील बेरोजगार वाढतच आहे व भारताकडून केल्या जाणाऱ्या औद्योगिक वस्तूंच्या निर्यातीच्या प्रमाणात घटच होत असून आंतरराष्ट्रीय व्यापारतोलातील असमतोल वाढतच आहे असे 1992 चे चित्र आहे.

## 25.8 औद्योगिक धोरणात अलीकडील बदल

सन 1982 हे 'उत्पादकता वर्ष' असे घोषित करण्यात आले. उत्पादन क्षमतेतील वाढीसंबंधी अधिक उदार धोरण स्वीकारण्यात आले. आधीच्या पाच वर्षांत कारखान्याने जास्तीत जास्त केलेले उत्पादन अधिक त्याच्या एक-तृतीयांश इतकी उत्पादनात वाढ करण्याची परवानगी देण्याचे ठरविण्यात आले.

औद्योगिक उत्पादनातील वाढीची, निर्यातवाढीची आणि तांत्रिक आधुनिकीकरणाची आवश्यकता लक्षात घेऊन मोठ्या औद्योगिक कंपन्या व औद्योगिक गृहे (म्हणजेच मक्तेदारी आणि फेरा कंपन्या) ज्या उद्योगात प्रवेश करून आपल्या कंपन्या काढू शकतील अशा उद्योगांच्या यादीत बदल करून ती यादी लांबविण्यात आली. याचा उद्देश अशा मोठ्या कंपन्यांमार्फत औद्योगिक वस्तूंच्या उत्पादनात जलद गतीने वाढ घडवून आणणे हा आहे. या धोरणामुळे तांत्रिक सुधारणेच्या, निर्यातीच्या आणि मध्यम पातळीवरील औद्योगिक संयोजकांच्या क्षेत्रात बरीच सुधारणा घडून आल्याचे दिसते. याच वेळी हेही स्पष्ट करण्यात आले की, सरकार लघुउद्योगांच्या व मध्यम पातळीवरील उद्योगांच्या वाढीला अग्रक्रम देईल आणि अशा उद्योगांमध्ये मोठ्या कंपन्यांपेक्षा छोट्या व मध्यम पातळीवरील कंपन्यांना अग्रक्रम दिला जाईल.

सन 1982 मध्ये औद्योगिक धोरणात जे बदल करण्यात आले त्यांचे मुख्य उद्देश म्हणजे 'गाभा' उद्योगांतील उत्पादनात वाढ घडवून आणणे. त्याचप्रमाणे निर्यातप्रधान व आयात पर्यायी उद्योगांच्या उत्पादनात वाढ घडवून आणणे. अत्याधुनिक औद्योगिक तंत्रांचा भारतीय उद्योगांमध्ये अधिकाधिक वापर केला जाऊन उत्पादनाच्या प्रमाणात वाढ घडवून

**(4) जादा स्थापित उत्पादन क्षमतेत कायद्याने संमती व स्थापित उत्पादन क्षमता वाढविण्या-संबंधीचे धोरण :** बऱ्याच मोठ्या कारखान्यांच्या बाबतीत असे आढळून आले की, परवानगी अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेल्यापेक्षा अधिक स्थापित उत्पादन क्षमतेची निर्मिती करण्यात आली होती. 1980 च्या धोरणाने राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाच्या उद्योगांतील कारखान्यांनी बेकायदेशीररीत्या निर्माण केलेल्या स्थापित उत्पादन क्षमतेस व म्हणूनच जादा उत्पादनास कायद्याने परवानगी दिली. सर्वसामान्य लोक ज्या वस्तूंचा उपभोग घेतात त्या उत्पादन करणाऱ्या कारखान्यांच्या बाबतीतही हेच धोरण स्वीकारण्यात आले व हेच धोरण 'गाभा' क्षेत्रातील उद्योगातील कारखान्यांच्या बाबतीत अनुसरण्यात आले.

इ. स. 1975 मध्ये 15 उद्योगांमध्ये विनापरवाना प्रतिवर्षी 5 टक्के जादा उत्पादन किंवा पाच वर्षांत 25 टक्के (कायदेशीररीत्या दिलेल्या परवानगीपेक्षा) जादा उत्पादन करण्यास परवानगी देण्यात आली होती. 1980 च्या धोरणानुसार वरील प्रकारे आपोआप उत्पादनवाढीची परवानगी आणखी काही उद्योगांतील कारखान्यांना (उदाहरणार्थ, पोलाद, अलोह धातू, वीजनिर्मितीचा उद्योग, वाहतूक साधने, रसायने, खते, सिमेंट, कागद, औषधे, शेती-अवजारे, निरनिराळ्या उद्योगांना लागणारी यंत्रे इत्यादी उद्योग) देण्यात आली.

**(5) औद्योगिक आजार :** सन 1980 च्या धोरणानुसार औद्योगिक आजारासंबंधी पूर्वसूचना देणारी यंत्रणा तयार करण्याचे ठरविण्यात आले. एखाद्या आजारी कारखान्याला उत्तम रीतीने चालणाऱ्या कारखान्याने आपल्यात समाविष्ट करून घेण्याचे ठरविल्यास उत्पन्न करात सूट व इतरही बाबतीत काही सूट देण्याचे ठरविण्यात आले. घटकराज्य सरकार, वित्तीय संस्था व कामगार संघटना यांनी एकत्रितपणे आजारी कारखान्यांचे पुनरुज्जीवन करावे असे सुचविण्यात आले. फक्त अपवादात्मक परिस्थितीतच आणि इतर मार्ग सफल न झाल्यास आणि सर्व समाजाच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असल्यासच आजारी कारखाने सरकार चालवावयास घेईल असे ठरविण्यात आले. अशा रीतीने शासनाने ताब्यात घेतलेले आजारी कारखाने चालविण्याची जबाबदारी घटकराज्य सरकारवर राहील असे स्पष्ट करण्यात आले.

**(6) निर्यातप्रधान उद्योगासंबंधी :** आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढता असमतोल आणि काही भारतीय वस्तूंचे परदेशातील वाढती मागणी लक्षात घेता, 1980 च्या धोरणाने निर्यातप्रधान उद्योगांना काही सोई-सुविधा व सवलती देण्याचे ठरविले.

**(7) उच्च पातळीवरील औद्योगिक तंत्रज्ञानासंबंधी :** भारतातील बऱ्याच कारखान्यांमध्ये उत्पादनाचे प्रमाण अत्यंत लहान असल्यामुळे अशा कारखान्यांना अत्याधुनिक तंत्रांचा वापर करता येत नाही. त्यामुळे त्या वस्तूंचा उत्पादन खर्च जादा राहतो व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत त्यांचे स्पर्धासामर्थ्यही अत्यंत मर्यादित राहते व विकसित देशांमध्ये तयार झालेल्या औद्योगिक मालाशी स्पर्धा करून परकीय बाजारपेठ काबीज करणे त्यांना फार कठीण होऊन बसते.

ज्या औद्योगिक कारखान्यांमध्ये उत्पादनाचे प्रमाण वाढविल्यास उत्पादन खर्च कमी होऊन वस्तूंची परकीय बाजारपेठेत यशस्वीरीत्या स्पर्धा करण्याचे सामर्थ्य प्राप्त होण्याची शक्यता आहे अशा उद्योगांतील कारखान्यांना अद्ययावत औद्योगिक तंत्र वापरण्यास व उत्पादनाचे प्रमाण वाढविण्यास परवानगी देण्याचे 1980 च्या औद्योगिक धोरणाने ठरविले.

ज्या कारखान्यात संशोधन व विकास खाते (R & D) काम करीत आहे व अशी खाती बरीचशी विकसित आहेत, त्यांना अत्याधुनिक औद्योगिक तंत्रज्ञान आयात करण्याची परवानगी देण्याचे ठरविण्यात आले. मात्र अट अशी की अशा कारखान्यांनी आयात केलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून व भारतातील परिस्थितीनुसार जरूर पडल्यास त्यात आवश्यक ते बदल करून असे तंत्रज्ञान इतर कारखान्यांनाही उपलब्ध करून द्यावे. असे केल्यास परकीय चलनांची बचत होईल व उत्पादन खर्चही कमी होऊन निर्यातीतील वाढीबरोबरच देशातील उपभोक्त्यांनाही त्याचा फायदा होईल.

सन 1980 च्या औद्योगिक धोरणाने हेही स्पष्ट केले की, मोठ्या उद्योगातील कारखान्यांची काही रक्कम 'संशोधन आणि विकास' यावर खर्च करण्यासाठी राखून ठेवावी व अशा संशोधनाने औद्योगिक कच्च्या मालांचा अधिक कार्यक्षम रीतीने उपयोग करणे, उत्पादन खर्च आणि किमती कमी करणे, निर्यातीस प्रोत्साहन देणे व देशातील उपभोक्त्यांच्या

(क) अधिकाधिक रोजगार उपलब्ध करून देणे.

(ख) औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या विभागांचा औद्योगिक विकास घडवून आणण्यास अग्रक्रम देऊन प्रादेशिक औद्योगिक असमतोल कमी करणे.

(ग) शेतीमालावर आधारलेल्या उद्योगांच्या विकासाला प्राधान्य देऊन शेतीक्षेत्र आणि औद्योगिक क्षेत्र यांमधील संबंध जास्तीत जास्त सुधारणे.

(ई) निर्यातप्रधान आणि आयात पर्यायी उद्योगांचा देशात जलद गतीने विकास घडवून आणणे.

(उ) शहरी व ग्रामीण भागातील लघुउद्योगांच्या विकासावर भर देऊन आर्थिक संघाच्या (Economic Federalism) तत्त्वाचे अनुकरण करणे.

(ऊ) औद्योगिक वस्तूंच्या किमतीच्या आणि गुणवत्तेच्या बाबतीत उपभोक्त्यांच्या हिताचे रक्षण करणे.

सन 1980 च्या औद्योगिक धोरणात खालील गोष्टींची तरतूद करण्यात आली.

(1) **सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये नवचैतन्य आणणे** : सन 1980 च्या औद्योगिक धोरणाने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये नवचैतन्य निर्माण करून त्या उद्योगांकडून अधिक रोजगार निर्माण होईल व वित्तीय साधनसामग्री निर्माण होऊन त्याचा आर्थिक विकासासाठी आणि इतर सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वापर करण्यात यावा असे ठरविले.

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने पुढील उपाययोजना करण्याचे ठरविण्यात आले. व्यवस्थापन अधिक मजबूत बनविणे, वित्त, विक्रीव्यवस्था, माहिती विभाग इत्यादी विभागांसाठी प्रशिक्षित व्यावसायिक वर्ग तयार करणे, प्रत्येक उद्योगाचा स्वतंत्र अभ्यास करून त्यावरून प्रत्येक उद्योगासाठी निश्चित स्वरूपाच्या उपाययोजना करणे आणि तुटीत चालणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमधील व्यवस्थापन व इतर बाबतीत अस्तित्वातील पद्धतीत सुधारणा करून ते उद्योग अधिक गतिशील व कार्यक्षम अशा चालकांच्या हाती सोपविणे.

(2) **लघुउद्योग आणि ग्रामोद्योग** : यंत्रसामग्रीच्या व जमिनीच्या किमतीत झालेली वाढ लक्षात घेऊन, लघुउद्योगांच्या विकासाच्या दृष्टीने स्थिर भांडवलाची मर्यादा वाढविण्यात आली. (अ) लघुउद्योगांच्या बाबतीतील स्थिर गुंतवणुकीची मर्यादा ₹ 10 लक्षांवरून ₹ 20 लक्षांपर्यंत वाढविण्यात आली. (ब) साहाय्यक उद्योगांच्या बाबतीतील स्थिर गुंतवणुकीची मर्यादा ₹ 15 लक्षांवरून ₹ 25 लक्षांपर्यंत वाढविण्यात आली; आणि (क) चिमुकल्या उद्योगांसाठीची गुंतवणुकीची मर्यादा ₹ 1 लक्षवरून ₹ 2 लक्षांपर्यंत वाढविण्यात आली.

गुंतवणुकीच्या या मर्यादा वाढविण्यामागचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत - स्थावर व इतर मालांच्या किमतीतील वाढीमुळे, पूर्वीच्या गुंतवणुकीच्या मर्यादा अव्यवहार्य ठरल्यामुळे, निरनिराळ्या मार्गांनी त्या मर्यादांचे उल्लंघन करण्याच्या प्रवृत्तीस आळा घालणे, बिनामी उद्योग काढण्याच्या प्रवृत्तीस आळा घालणे व खऱ्या लघुउद्योजकांना लघुउद्योग क्षेत्रात त्यांच्या उत्पादनसंस्था काढण्यास प्रोत्साहन देणे.

अल्प व दीर्घ मुदतीची कर्जे देऊन लघुउद्योगांच्या विकासाला गती देण्याचे कार्य पुढे चालू ठेवण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे लघुउद्योगांना अल्प व दीर्घ मुदतीची कर्जे देणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील निरनिराळ्या वित्तीय संस्थांच्या कार्यात सुधारणा आणण्याचे ठरविण्यात आले.

ग्रामीण भागात अधिक रोजगार निर्माण करण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागातील लघुउद्योगांच्या विकासावर भर देण्याचे ठरविण्यात आले. पण हे करताना निसर्गाचा समतोल बिघडणार नाही याकडे लक्ष देण्याचे ठरले. खादी, हातमाग व इतर ग्रामोद्योगांच्या विकासावर भर देऊन त्यांच्या विकासाची गती वाढविण्याचे ठरविण्यात आले.

(3) **मागास भागातील औद्योगिक विकास आणि औद्योगिक क्षेत्रात स्वायत्त संघटना** : भारतात औद्योगिक क्षेत्रात स्वायत्त संघटन प्रकारचे औद्योगिक व्यवस्थापन करण्याचे ठरविण्यात आले. औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या भागात एक मोठा मध्यवर्ती औद्योगिक प्रकल्प स्थापून व त्याच्या जोड-उद्योगांच्या विकासाला प्रोत्साहन देऊन व इतर लघुउद्योग स्थापन करून औद्योगिक विकास घडवून आणणे व त्याच वेळी लघू व ग्रामोद्योगांमध्ये तांत्रिक सुधारणा घडवून आणून, अधिक प्रेरणा उपलब्ध करून देऊन औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या विभागांचा औद्योगिक विकास

परिस्थितीत 1948 चा औद्योगिक धोरणविषयक ठराव पास करण्यात आला. साहजिकच, 1948 च्या ठरावाचे स्वरूप तात्पुरत्या स्वरूपाचे व प्रदीर्घ विचाराविना पास केलेला ठराव असे होते व त्यामुळे त्यात बऱ्याच बाबी मोघम स्वरूपात मांडण्यात आल्या व काही त्रुटी त्या धोरणात राहिल्या. याउलट 1956 चा औद्योगिक धोरणविषयक ठराव बऱ्याच भारताची राज्यघटनेतील व पंचवार्षिक योजनांची प्रमुख उद्दिष्टे लक्षात ठेवून, पास करून स्वीकारण्यात आला. साहजिकच, 1948 च्या ठरावापेक्षा 1956 च्या औद्योगिक धोरणविषयक ठरावाचे भारताच्या औद्योगिकीकरणावर दूरगामी परिणाम झाले व होत आहेत.

## 25.6 1977 चे औद्योगिक धोरण

जनता पक्षाचे सरकार मार्च 1977 मध्ये सत्तेवर आले. त्यापूर्वी केंद्रात काँग्रेस पक्ष सत्तारूढ होता. जनता पक्षाच्या सरकारने आपल्या औद्योगिक धोरणाची घोषणा डिसेंबर 1977 मध्ये लोकसभेत केली.

जनता सरकारच्या दृष्टीने जे 1956 चे औद्योगिक धोरण कार्यवाहीत होते त्या धोरणामुळे काही औद्योगिक बाबतीत प्रगती झालेली असली तरी ठरविलेली उद्दिष्टे गाठण्यात 1956 च्या औद्योगिक धोरणात यश आले नाही, असे जनता सरकारचे मत होते.

जनता सरकारच्या मते 1956 चे धोरण जवळजवळ दोन दशके कार्यवाहीत असूनही भारतात बेरोजगारांच्या संख्येत वाढ झाली होती. शहरी आणि खेड्यांचा विभाग यामधील आर्थिक विषमतेची दरी रुंदावलेली होती. सर्वसाधारणपणे औद्योगिक वाढीचा वार्षिक दर तीन ते चार टक्क्यांपर्यंतच वाढू शकला. औद्योगिक आजार वाढला होता व काही मोठ्या उद्योगांनाही त्याची बाधा झालेली होती. औद्योगिक क्षेत्रात खर्च व किमती यांमधील संबंध विस्कळीत झाले होते आणि उद्योगांचे विकेंद्रीकरण अत्यंत मंद गतीने होत होते.

जनता सरकारच्या मते 1956 च्या औद्योगिक धोरणाने केलेली लघुउद्योगांच्या विकासाची घोषणा फक्त कागदोपत्रीच राहिली व त्या क्षेत्रात फारच कमी कार्य केले गेले. मोठ्या उद्योगांच्या विकासावर सरकारने सदैव लक्ष केंद्रित केले. सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्थांच्या मदतीने, खासगी क्षेत्रातील उद्योगपतींनी आपले औद्योगिक साम्राज्य विस्तारण्यात यश मिळविले आणि बऱ्याच आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात येऊन येथील संरक्षित बाजाराचा फार मोठा फायदा उठवून आपल्या नफ्यात प्रचंड भर घालून घेतली. अशा रीतीने जनता सरकारने जे 1956 चे औद्योगिक धोरण 1976 पर्यंत कार्यवाहीत होते, त्याच्या वरील फलश्रुतीवर कडक टीका केली.

या पार्श्वभूमीवर जनता सरकारने आपल्या औद्योगिक धोरणाची घोषणा डिसेंबर 1977 मध्ये लोकसभेत केली.

### सन 1977 च्या औद्योगिक धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये

सन 1977 च्या औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती.

(1) **लघुउद्योगांच्या विकासावर भर :** जनता सरकारच्या मते तोपर्यंत मोठ्या उद्योगांच्या विकासावर भर देण्यात आला होता व लघुउद्योगांकडे दुर्लक्ष केले गेले. जनता सरकारने असे ठरविले की, ज्या वस्तूंचे उत्पादन लघुउद्योगांच्या क्षेत्रात करता येणे शक्य आहे अशा वस्तूंचे उत्पादन लघुउद्योगाच्या क्षेत्राकडूनच केले जावे.

जनता सरकारने लघुउद्योगांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण केले.

(अ) **कुटीरोद्योग आणि घरी बसून करता येण्याजोगे (म्हणजेच गृहाधिष्ठित) उद्योग :** यामध्ये स्वयंरोजगारास मोठा वाव आहे.

(ब) **चिमुकले उद्योग क्षेत्र :** यात अशा उद्योगांचा समावेश करण्यात आला की, ज्या उद्योगांमध्ये यंत्रसामग्री व इतर साधनांवर ₹ 1 लक्षपर्यंतच गुंतवणूक करणे शक्य आहे व जे कारखाने 50,000 पेक्षा कमी लोकसंख्येच्या गावी स्थापलेले आहेत.

(क) **लघुउद्योग :** यात अशा कारखान्यांचा समावेश करण्यात आला की, ज्यात जमीन व यंत्रसामग्री इत्यादींवर भांडवल गुंतवणूक करणे जरूर आहे व ₹ 15 लक्षपर्यंत स्थिर भांडवल आहे. (जर असा कारखाना मोठ्या उद्योगांना सुटे भाग इत्यादी ... असल्यास.)

इंग्लंड व जर्मनी इत्यादी राष्ट्रांतील उद्योगांची पुनःप्रगती झाल्यावर त्यांच्याशी यशस्वी रीतीने स्पर्धा करणे भारतीय उद्योगांना कठीण होऊ लागले. त्यामुळे भारतीय उद्योगांनी आपणास परदेशी औद्योगिक मालांपासून संरक्षण मिळावे अशी मागणी सुरू केली.

परिणामी इ. स. 1922 मध्ये भारत सरकारने भारतीय वित्तीय आयोगाची नेमणूक केली. त्या आयोगाने अशी शिफारस केली की, भारतातील ज्या उद्योगांना कच्चा माल भरपूर उपलब्ध आहे, ज्या उद्योगांना भारतात बाजारपेठ उपलब्ध आहे व जे उद्योग नजीकच्या भावी काळात संरक्षणाविना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची शक्यता आहे अशा भारतीय उद्योगांना संरक्षण देण्यात यावे. औद्योगिक संरक्षणविषयक येणाऱ्या अर्जांचा विचार करून भारत सरकारला शिफारस करण्यासाठी टॅरिफ बोर्ड नेमण्यात यावे अशीही शिफारस करण्यात आली व असे मंडळ नेमण्यात आले.

भेदात्मक औद्योगिक संरक्षणासंबंधीच्या शिफारशीत बऱ्याच त्रुटी होत्या हे निश्चित, तरीही भेदात्मक औद्योगिक संरक्षण देण्याच्या धोरणाच्या मदतीने लोखंड व पोलाद, साखर, काड्यापेट्या आणि कागद इत्यादी उद्योगांचा विकास झाला. या संरक्षणविषयक धोरणामुळेच वर निर्देशिलेल्या भारतीय उद्योगांना 1929-33 या काळातील महामंदीला तोंड देणे काही प्रमाणात शक्य झाले.

### दुसरे महायुद्ध (1939-45)

दुसऱ्या महायुद्धाची व्याप्ती व त्या युद्धात झालेल्या विध्वंसाचे प्रमाण पहिल्या महायुद्धापेक्षा फार मोठे होते. अमेरिका व युरोपमधील देशांबरोबरच जपानचाही या युद्धात सहभाग होता. या कारणामुळे त्या देशांकडून भारतात होणारी औद्योगिक वस्तूंची आयात पूर्णपणे थांबली व त्यामुळे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात बरेच नवे उद्योग भारतात स्थापण्यात आले. अशा प्रकारे नव्या व जुन्या उद्योगांचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून आला. कापड, ताग, साखर, कागद, लोखंड व पोलाद, अभियांत्रिकी व रासायनिक उद्योग इत्यादींचा विकास घडून आला. दुसऱ्या महायुद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा भारतीय उद्योगांना निश्चितच फायदा झाला.

## 25.2 स्वातंत्र्योत्तर काळातील औद्योगिक धोरण

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात ब्रिटिश राज्यकर्ते सत्तेवर असल्याकारणाने सर्वसमावेशक असे औद्योगिक धोरण नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळात देशाचे भवितव्य ठरविण्याचे अधिकार भारतीयांकडे असल्याकारणाने सर्वसमावेशक असे औद्योगिक धोरण ठरविणे व त्यांची कार्यवाही करणे शक्य झाले.

भारताचे औद्योगिक धोरण ठरविणे व त्याची कार्यवाही या गोष्टी एका विशिष्ट चौकटीतच होणे आवश्यक होते. भारताने स्वीकारलेली लोकशाही राज्यपद्धती, भारतीय राज्यघटना, पंचवार्षिक योजनांचा आराखडा आणि त्यांची आर्थिक व औद्योगिक क्षेत्रातील ठरवून दिलेली उद्दिष्टे व उद्योगांची क्रमवारी या सर्वांनी ठरवून दिलेल्या चौकटीतच स्वतंत्र भारतातील औद्योगिक धोरणाचा विकास घडून आला व त्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात आली. जसजसा अनुभव येत गेला तसतसे काही बदल भारताच्या औद्योगिक धोरणात वारंवार करावे लागणे अपरिहार्य होते.

### औद्योगिक धोरणाची प्रमुख उद्दिष्टे

भारताच्या औद्योगिक धोरणापुढे (म्हणूनच सर्वसाधारणपणे आर्थिक धोरणापुढे) पुढील उद्दिष्टे होती आणि आहेत -

1. जलद गतीने भारतात औद्योगिकीकरण घडवून आणणे.
2. निरनिराळे औद्योगिक कौशल्य अंगी असलेल्या श्रमिकांना विविध उद्योगांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.
3. लोकशाहीच्या चौकटीत समाजवादी समाज स्थापण्याचे उद्दिष्ट गाठणे.
4. औद्योगिक क्षेत्रात सार्वजनिक (म्हणजे सरकारी) उद्योगांची वाढ घडवून आणणे व त्यांना भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान प्राप्त करून देणे.
5. औद्योगिक क्षेत्रात खासगी मक्तेदारीच्या उदयास व विकासास प्रतिबंध घालणे.
6. प्रादेशिक औद्योगिक विषमता कमी करणे व निरनिराळ्या प्रदेशांचे औद्योगिकीकरण घडवून आणणे.

## 23.2 भारताच्या आधुनिक औद्योगिकीकरणाची पार्श्वभूमी

18 व्या शतकाच्या मध्यापासून भारतातील उद्योग विनाशाला लागण्याची कारणे पुढीलप्रमाणे होती -

इंग्लंडने 1818 साली भारतावर संपूर्ण स्वामित्व स्थापन केल्यावर साहजिकच ब्रिटिश राज्यकर्त्यांनी इंग्लंडला व इंग्लंडमधील वाढीस लागलेल्या उद्योगांना पोषक असे धोरण भारतात अवलंबिण्यास सुरुवात केली.

18 व्या शतकाच्या मध्यापासून इंग्लंड हे औद्योगिक राष्ट्र होऊ लागले व लवकरच इंग्लंड म्हणजे युरोपियन राष्ट्रांचा कारखाना म्हणून ओळखले जाऊ लागले. इंग्लंडमधील कारखान्यांत मोठ्या प्रमाणावर उत्पादन केलेल्या व स्वस्त अशा औद्योगिक वस्तूंना भारतातील मोठी बाजारपेठ मिळावीं म्हणून भारताकडून आयात केल्या जाणाऱ्या औद्योगिक मालावर बंधने घालण्यात आली; पण त्याच वेळी आणि पुढे बराच काळपर्यंत इंग्लंडमधील कारखान्यांमध्ये तयार होणाऱ्या औद्योगिक मालास भारतामधील बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून इंग्लंडने व्यापाराच्या बाबतीत निर्हस्तक्षेपाचे धोरण अवलंबिले व भारतातील उद्योगांना इंग्लंडकडून येणाऱ्या औद्योगिक वस्तूंच्या आयातीपासून कोणत्याही प्रकारचे संरक्षण मिळू नये अशा तऱ्हेची धोरणे भारतामधील ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अवलंबिली.

साहजिकच इंग्लंडमधील कारखान्यात मोठ्या प्रमाणावर यंत्रांच्या साहाय्याने तयार झालेल्या व स्वस्त औद्योगिक वस्तूंशी स्पर्धा करणे भारतात तयार झालेल्या वस्तूंना शक्य नव्हते. साहजिकच अशा प्रकारे इंग्लंडमधील कारखानदारीने भारतातील उद्योगांचा मोठ्या प्रमाणावर विनाश घडवून आणला.

त्याच सुमारास (म्हणजेच 19 व्या शतकाच्या मध्यापासून) वाहतूक क्षेत्रातही क्रांती सुरू झाली आणि आगगाड्यांची व जहाजांची वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. त्यामुळे इंग्लंडमध्ये तयार झालेल्या औद्योगिक वस्तू झपाट्याने भारतातील शहरी व काही काळानंतर ग्रामीण भागातील बाजारपेठा काबीज करू शकल्या. भारत सरकारच्या (म्हणजेच ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या निर्हस्तक्षेपी धोरणामुळे इंग्लंडमध्ये तयार झालेल्या औद्योगिक वस्तूंना भारतीय बाजारपेठेवर कब्जा करणे सहज शक्य झाले.)

भारतातील देशी राज्ये व संस्थाने नष्ट झाल्यामुळे त्यांच्याकडून मौल्यवान वस्तूंच्या मागणीतही मोठी घट घडून आली व असे कलाकुसरीचे उद्योगही विलयाला जाऊ लागले. देशी राजे व संस्थानिकांच्या नाशाबरोबरच शस्त्रास्त्रे तयार करणारे कारखाने बंद पडले व तो उद्योगही नष्टप्राय झाला.

सन 1833 पासून भारतात इंग्रजी शिक्षणाची सोय झाली व सुनिश्चित मध्यम वर्गाचा उदय होऊ लागला. आपल्या ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या राहणीचे ते आंधळेपणाने अनुकरण करू लागले व इंग्लंडमध्ये तयार झालेला कारखानदारी माल वापरण्याकडे त्यांची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत गेली. परिणामी या वर्गाकडून भारतीय औद्योगिक वस्तूंसाठी असलेली मागणी क्रमशः कमी-कमी होत गेली व त्याचा साहजिकच अनिष्ट परिणाम भारतातील उद्योगांवर झाला.

पण भारतामधील एकेकाळी ऊर्जितावस्थेत असलेले उद्योग विनाशाच्या मार्गाला लागले त्याबद्दल दोष फक्त भारतातील ब्रिटिश राज्यकर्त्यांना व त्यांनी अनुसरलेल्या धोरणांना देऊन भागणार नाही तर भारतीय उद्योगांनीही स्थळ-काळाचे व झपाट्याने बदलत असलेल्या परिस्थितीचे भान ठेवले नाही व आपल्या उद्योगात व औद्योगिक संघटनेत आवश्यक ते कालानुरूप बदल केले नाहीत हे कारणही (इतर कारणांबरोबर) भारतातील उद्योगांच्या विनाशाला कारणीभूत झाले.

अशा रीतीने वर उल्लेखिलेल्या कारणांमुळे प्राचीन काळापासून औद्योगिक क्षेत्रात आघाडीवर असलेला भारत देश सन 1850 नंतर झपाट्याने शेतीप्रधान देश बनला व पूर्वी औद्योगिक मालांची मोठ्या प्रमाणावर युरोप आणि आशिया खंडातील निरनिराळ्या देशांकडे आयात करणारा देश सन 1850 नंतर इंग्लंड व युरोपातील इतर औद्योगिक देशांकडे औद्योगिक कच्चा मालाचा व कापूस, अन्नधान्ये, तेलबिया, चहा, कॉफी, कातडी इत्यादी शेतीक्षेत्रात उत्पादन होणाऱ्या मालांची निर्यात करणारा देश बनला.

राखून ठेवले. परिशिष्ट 'क' मधील उद्योग खासगी औद्योगिक क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात आले असले तरी पंचवार्षिक योजनेतील उद्दिष्टे आणि लक्ष्ये साध्य करण्याच्या दृष्टीने आवश्यक वाटल्यास या गटातील उद्योगातही प्रवेश करण्याचा हक्क सरकारने आपल्याकडे राखून ठेवला.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येईल की, सरकारने भारतातील जवळजवळ सर्व औद्योगिक क्षेत्रांमध्ये आपणाकडे अधिकार घेतले आहेत. असे असले तरी सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील उद्योगांचे सलोख्याचे संबंध वाढीस लागून भारतातील औद्योगिक क्षेत्राचा (आणि पर्यायाने सर्व अर्थव्यवस्थेचा) जलद विकास घडून यावा असे सरकारचे उद्दिष्ट होते.

## खासगी क्षेत्रातील उद्योगांना सरकारकडून न्याय्य व समानतेची वागणूक

खासगी क्षेत्रातील उद्योगांची वाढ होण्यासाठी आणि त्यांच्या वाढीला अनुकूल परिस्थिती निर्माण केली जाण्यासाठी वीज, दळणवळण आणि वाहतूक व इतर सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याचे आणि त्याचप्रमाणे करविषयक आणि इतर संबंधित धोरणे अनुसरण्याचे सरकारने ठरविले. खासगी क्षेत्रातील उद्योगांच्या विकासासाठी, वित्तपुरवठा करण्यासाठी संस्था निर्माण करणे, सहकारी तत्त्वावर स्थापन करण्यात आलेल्या उद्योगांना व कारखान्यांना विशेष मदत करणे इत्यादी कामे सरकारने करण्याचे ठरविले. पण त्याचबरोबर 1956 च्या औद्योगिक धोरणविषयक ठरावाने हेही स्पष्ट केले की, सरकारने ठरविलेल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांशी पूर्णपणे सुसंगत अशा रीतीनेच खासगी क्षेत्रातील उद्योग चालविले गेले पाहिजेत. पंचवार्षिक योजनांच्या चौकटीतच खासगी उद्योगांना स्वातंत्र्य देण्याचा सरकार शक्य तेवढा प्रयत्न करील. एखाद्या उद्योगात (उदाहरणार्थ, पोलाद उद्योगात परिस्थिती आढळते तशी) सार्वजनिक मालकीच्या आणि खासगी मालकीच्या अशा दोन्ही प्रकारच्या उत्पादनसंस्था अस्तित्वात असल्यास त्या दोघांनाही समान वागणूक दिली जाईल.

## लघुउद्योग व ग्रामोद्योगांचा विकास

सन 1956 च्या धोरणाने असे ठरविण्यात आले की, मोठ्या उद्योगांमध्ये तयार होणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनावर मर्यादा घालून त्याचप्रमाणे करआकारणीत भेदाभेद करून आणि वित्तसाहाय्य देऊन लघू व ग्रामोद्योगांच्या विकासास सरकार उत्तेजन देईल. उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने लघुउद्योगांच्या व ग्रामोद्योगांच्या विकासाला 1956 च्या धोरणात महत्त्वाचे स्थान देण्यात आले. त्यांची स्पर्धाशक्ती वाढविण्याचा सरकार प्रयत्न करील. सहकारी तत्त्वांच्या आधारे लघुउद्योगांच्या वाढीला प्रोत्साहन दिले जाईल. थोडक्यात लघुउद्योग, कुटीरोद्योग, ग्रामोद्योग व लहान प्रमाणावरील इतर उद्योग, विविध प्रकारचे फायदे उपलब्ध करून देत असल्यामुळे अशा उद्योगांचा विकास करण्याचे सरकारचे उद्दिष्ट राहील. या उद्योगांच्या विकासामुळे ग्रामीण भागातील श्रमिकांचे कौशल्य, तेथील बचत, श्रमिक व औद्योगिक कच्चा माल या सर्वांचा उत्पादन कार्यासाठी वापर केला जाईल व विकेंद्रित उद्योग क्षेत्र निर्माण होण्यास मदत होईल.

## प्रादेशिक विषमता कमी करणे

विविध घटकराज्यांतील आर्थिक विषमता कमी केली जावी असे 1956 च्या धोरणाचे उद्दिष्ट होते. काही घटक-राज्ये उद्योगांच्या विकासाच्या दृष्टीने मागे पडली होती व त्याचे प्रमुख कारण म्हणजे त्या ठिकाणी असणारी कच्च्या मालाची टंचाई हे होय. टंचाई दूर करण्याच्या दृष्टीने 1956 च्या ठरावात असे म्हटले गेले की, जर देशाचा एखादा भाग औद्योगिक विकास होण्याच्या दृष्टीने सर्व बाबतीत योग्य असेल तर त्या भागात उद्योगांच्या वाढीसाठी आवश्यक तो कच्चा माल उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था केली जावी. सर्व प्रदेशांचा औद्योगिक विकास झाल्यास देशाच्या औद्योगिक व शेतीच्या प्रगतीस गती येईल व लोकांचे राहणीमान उंचावण्यास मदत होईल.

## तांत्रिक व व्यवस्थापन विषयांच्या शिक्षणाची सोय

देशातील औद्योगिक विकासाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविण्यासाठी देशात तांत्रिक आणि व्यवस्थापनासंबंधीचे ज्ञान असलेले प्रशिक्षित लोक असणे आवश्यक असते ही गोष्ट 1956 च्या ठरावात मान्य केली गेली. पर्यवेक्षणाच्या पातळीवर काम करणाऱ्या प्रशिक्षित श्रमिकांचा तुटवडा पडू नये म्हणून निरनिराळ्या विद्यापीठांमध्ये आणि औद्योगिक कारखान्यांमध्ये अशा प्रकारचे विशेष शिक्षण दिले जाण्यासाठी सोय केली जावी तसेच सार्वजनिक आणि खासगी कारखान्यांतून अशा तऱ्हेचे प्रशिक्षण देण्यात यावे असे 1956 च्या ठरावात नमूद करण्यात आले.

सन 1977 च्या धोरणाने जरी 807 वस्तूंचे उत्पादन लघुउद्योग क्षेत्रासाठी राखून ठेवले तरीही बिस्किटे, पाव, पादत्राणे व चामड्यांच्या इतर वस्तू, ब्रश इत्यादी वस्तूंचे उत्पादन मोठ्या व परदेशी कंपन्यांकडून केले जाणे चालूच राहिले. अशा प्रकारचे उत्पादन रोखण्यात जनता सरकारला यश आले नाही.

मोठ्या उद्योगांच्या बाबतीतील जनता सरकारच्या धोरणावर मोठ्या उद्योगपतींनी टीका केली. आकस्मिकरीत्या सार्वजनिक वित्तीय संस्थांकडून मोठ्या उद्योगांना वित्तपुरवठा बंद करून त्यांना त्यांच्या अंतर्गतरीत्या निर्माण केलेल्या वित्तीय मदतीवरच अवलंबून राहण्यास सांगण्यात आले. आकस्मिकरीत्या वित्तीय बाबतीत स्वयंपूर्ण होणे मोठ्या उद्योगांना शक्य नव्हते; त्यामुळे त्यांची वाढ खुंटेल, अशी सार्थ भीती मोठ्या उद्योगांनी व्यक्त केली. त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्रातील निरनिराळ्या असमाधानकारक घटनांना आपणास विनाकारण जबाबदार धरले जात आहे अशी त्यांनी भूमिका घेतली.

परकीय कंपन्यांबरोबर भारतीय कंपन्या करीत असलेल्या सहयोग कराराबाबत 1977 च्या धोरणाने नवीन काहीच केले नाही. त्या धोरणाने 1956 च्या धोरणात जे निवेदन करण्यात आले होते त्याचेच अनुकरण केले.

सन 1977 च्या औद्योगिक धोरणात काही चांगल्या गोष्टींवर भर देण्यात आला. उदाहरणार्थ, खासगी उद्योगपतींच्या औद्योगिक साम्राज्यावर नियंत्रण ठेवणे, श्रमिकांना उद्योगांच्या मालकी हक्कात व व्यवस्थापनात सहभागी करून घेणे, सार्वजनिक क्षेत्र वाढविणे, जिल्हा औद्योगिक केंद्रे स्थापणे, उद्योगांचे देशात विकेंद्रीकरण घडवून आणणे, इत्यादी. पण या सर्व गोष्टी 1956 च्या औद्योगिक धोरणात आधीच नमूद करण्यात आल्या होत्या आणि जनता सरकारने फक्त त्याच गोष्टी पुन: सांगितल्या एवढेच.

जनता सरकारच्या मनात मोठ्या उद्योगांबाबत पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन असल्याचे दिसून येते. औद्योगिक कारखाने मोठे आहेत म्हणून त्यात दोष निर्माण होत नाहीत, तर असे दोष निर्माण होण्याची कारणे कारखान्यांच्या मोठ्या आकारात शोधण्याऐवजी इतरत्र शोधणे आवश्यक आहे.

मोठे उद्योग व लघुउद्योग हे एकमेकांस पूरक आहेत हे जनता सरकारच्या लक्षात आले नाही व याबाबत त्यांच्या मनात गोंधळ असल्याचे दिसून येते. लघुउद्योगांकडून राखून ठेवलेल्या वस्तूंचे मोठ्या संख्येने उत्पादन न झाल्यास अशा वस्तूंचा तुटवडा पडून त्यांच्या किमती वाढतील व त्याचा समाजाच्या कल्याणावर प्रतिकूल परिणाम होईल हे स्पष्ट दिसत असूनही जनता सरकारने ते मान्य केले नाही.

जनता सरकार निरनिराळी मते असणाऱ्या पक्षांचे बनले होते व फक्त 3 वर्षच टिकले. त्यामुळे वर निर्देश केलेल्या औद्योगिक धोरणाची कार्यवाही करण्यास त्यांना पुरेसा वेळ मिळाला नाही.

## 25.7 1980 चे औद्योगिक धोरण

1977 पासून 1980 पर्यंत मध्यवर्ती सत्तेवर असलेल्या जनता पक्षाच्या जागी काँग्रेस पक्षाचे सरकार 1980 साली सत्तेवर आले आणि 1977 च्या जनता सरकारच्या औद्योगिक धोरणाऐवजी काँग्रेस सरकारने आपल्या औद्योगिक धोरणाची घोषणा 23 जुलै, 1980 रोजी केली.

सन 1980 चे औद्योगिक धोरण 1956 च्या औद्योगिक धोरणावर आधारलेले होते. 1980 च्या धोरणानुसार, भारतात जलद गतीने औद्योगिकीकरण घडवून आणण्याची आवश्यकता आहे, औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत सरकारच्या सहकार्याचा व मदतीचा आवर्जून उल्लेख करण्यात आला. उद्योगांच्या विकासामुळे योग्य किमतीस औद्योगिक वस्तू बाजारात उपलब्ध होतील असे स्पष्ट करण्यात आले. औद्योगिकीकरणामुळे रोजगाराच्या अधिकाधिक संधी लोकांना उपलब्ध होऊन त्यामुळे भारतातील प्रतिडोई उत्पन्न वाढविण्यास मदत होईल हे स्पष्ट करण्यात आले आणि औद्योगिकीकरणामुळे ट्रॅक्टर, खते, जंतुनाशक औषधे आणि वीज इत्यादी सोई-सुविधा उपलब्ध झाल्याकारणाने शेतीक्षेत्रातही देशाच्या औद्योगिकीकरणामुळे जलद गतीने प्रगती घडून येईल असे स्पष्ट करण्यात आले.

### सन 1980 च्या औद्योगिक धोरणाची सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे

सन 1980 च्या औद्योगिक धोरणाची सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत -

(अ) औद्योगिक क्षेत्रातील स्थापित उत्पादन क्षमतेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेणे.

(ब) औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन जास्तीत जास्त वाढविणे आणि औद्योगिक उत्पादकतेत वाढ घडवून आणणे.

## ...कामगारांसाठी सोई-सुविधा

सन 1956 च्या ठरावात विविध उद्योगांमध्ये काम करणाऱ्या श्रमिकांना निरनिराळ्या सोई-सुविधा उपलब्ध करून ... त्यांना कारखान्यांच्या व्यवस्थापनात सहभागी करून घेणे, मालक व मजूर यांच्यामध्ये सलोख्याचे औद्योगिक संबंध ... करणे, श्रमिकांची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने त्यांना विविध सोई व प्रेरणा पुरविणे इत्यादी गोष्टींचा उल्लेख ... आला. वाढते सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग व्यावसायिक तत्त्वावर चालवून तसेच अधिक गुंतवणुकी व ...सामग्री निर्माण करून व्यवस्थापन-श्रमिक संबंधात आदर्श निर्माण करण्यात यावे असे सुचविण्यात आले.

## परकीय भांडवलासंबंधीचा दृष्टिकोन

परकीय भांडवल व तंत्रज्ञ यांची भारताच्या जलद औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागाची आवश्यकता असल्यामुळे ... च्या ठरावात यासंबंधी 1948 चेच धोरण चालू ठेवण्याचे ठरविण्यात आले. परकीय भांडवल व तंत्रज्ञ यांची ...कता असूनही, त्यांचे स्वागत करूनही, परकीय भांडवलाचा व तंत्रज्ञ असलेल्या उद्योगांत भारतीयांचे वर्चस्व राहील ... परकीय तंत्रज्ञांच्या मदतीने भारतीय तंत्रज्ञ प्रशिक्षण घेऊन तंत्रज्ञांच्या बाबतीत भारताने स्वावलंबी व्हावे असे उद्दिष्ट ...विण्यात आले.

## सन 1956 च्या उद्योगविषयक धोरणाचे मूल्यमापन

सन 1950 मध्ये भारतीय घटनेचा स्वीकार करण्यात आला व समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट मान्य करण्यात आले. ... च्या उद्योगांविषयींच्या धोरणाचा ठराव म्हणजे त्या ठरावाने भारतात वरील उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने स्वीकारलेली ...िक घटना' होय असे मानले जाते.

सन 1956 च्या ठरावाने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची वाढ करण्याचे ठरविण्यात आले व त्याप्रमाणे पुढील 2-3 ... सन 1956 च्या धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये प्रचंड वाढ करण्यात आली. पण हे उद्योग कार्यक्षमतेने ... जात आहेत किंवा नाहीत याकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही त्यामुळे 1956 च्या धोरणावर आधारित वाढत्या ...जनिक उद्योगांमध्ये प्रचंड प्रमाणावर अकार्यक्षमता, साधनसामग्रीचा अपव्यय इत्यादी दोष दिसून येऊ लागले. ...जनिक क्षेत्रातील वाढते कारखाने व उद्योग योग्य प्रकारे चालविण्यास कुशल व्यवस्थापक वर्ग अद्याप पुरेसा उपलब्ध ...नसल्याचे आढळते.

सन 1956 च्या धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्राची झपाट्याने वाढ घडवून आणली गेल्याकारणाने, त्यांच्या ...मक्तेदारीमुळे व महत्त्वाच्या उद्योगांमधील त्यांच्या मक्तेदारीमुळे खासगी उद्योगांना आवश्यक त्या सेवा-सुविधा ...जनिक क्षेत्रातील उद्योगांकडून पुरविल्या न गेल्याकारणाने खासगी क्षेत्रातील उद्योगांच्या वाढीच्या गतीवर त्याचा अनिष्ट ... घडून आला. सन 1956 च्या सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांसंबंधीच्या धोरणात 1980 नंतर बदल करण्यात येत ... सन 1956 च्या धोरणाचा मध्यंतरीच्या काळात औद्योगिक प्रगतीवर अनिष्ट परिणाम झाला हे निश्चित.

1956 च्या ठरावात सर्वसाधारणपणे खासगी क्षेत्रातील उद्योगांबाबत, त्यांच्या भावी कार्याबद्दल व प्रगतीबद्दल संशय ... केला गेल्याचे आढळते. निव्वळ खासगी उद्योगांमुळे देशाची औद्योगिक प्रगती व विकास घडून येणे आवश्यक आहे ...र्णतावर ते धोरण ठरविलेले दिसून येते.

...मध्ये जरी 'मिश्र' अर्थव्यस्थेचे उद्दिष्ट ठरविण्यात आले तरी भारताच्या मिश्र अर्थव्यवस्थेत खासगी उद्योगांना ... स्थान दिले गेल्याचे दिसत नाही. श्री. वेंकट सुबय्या यांनी म्हटल्याप्रमाणे ''जे सार्वजनिक क्षेत्र करू शकणार नाही ... उद्योग खासगी क्षेत्राकडे सोपविण्यात आले.'' याचाच अर्थ, मिश्र अर्थव्यवस्था ही नाममात्र मिश्र व्यवस्था होय ... निर्माण झाली.

... उद्योजकांनी व अर्थशास्त्रज्ञांनी अशी भीती व्यक्त केली की, 'सार्वजनिक क्षेत्र खासगी क्षेत्राला शेवटी गिळून ...'. पण 1956 च्या औद्योगिक धोरणाच्या पुरस्कर्त्यांनी सदरहू भीती निराधार आहे असे स्पष्ट केले. त्यांनी भावी ... खासगी क्षेत्रातील विविध उद्योगांनी केलेल्या प्रगतीमुळे ही भीती निराधार होती हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. ... सार्वजनिक ... उद्योग यामध्ये कोणतेही वैर नसून किंवा ती दोन क्षेत्रे ही

## सन 1991 च्या औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये

जुलै 1991 च्या औद्योगिक धोरणाने सन 1956 च्या धोरणात घडवून आणलेले महत्त्वाचे बदल पुढीलप्रमाणे आहेत.

**(1) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांबाबत नवा दृष्टिकोन** : महत्त्वाचा फरक सरकारी (म्हणजेच सार्वजनिक) उद्योगांबाबतच्या धोरणासंबंधी आहे. सन 1956 च्या औद्योगिक धोरणानुसार परिशिष्ट 'अ' मधील 17 उद्योगांमध्ये सरकारी मक्तेदारी होती व त्या उद्योगांमध्ये खासगी क्षेत्रातील उद्योजकांना यावयास मज्जाव होता. त्याचप्रमाणे सन 1956 च्या धोरणानुसार परिशिष्ट 'ब' मधील 12 उद्योगांतही सरकारनेच जास्तीत जास्त महत्त्वाची भूमिका पार पाडावयाची होती.

जुलै 1991 च्या औद्योगिक धोरणाने वरील बाबतीत मूलभूत बदल सुचविले आहेत. सन 1991 च्या धोरणानुसार सरकारी (म्हणजेच सार्वजनिक) क्षेत्रासाठी फक्त सात उद्योग (शस्त्रनिर्मिती, दारूगोळा, अणुशक्ती, रेल्वेवाहतूक, कोळसा व लिग्नाइट, खनिज तेले, लोखंड, जस्त, मँगेनीज, गंधक इत्यादी यांच्या खाणी आणि अणुशक्तीसाठी आवश्यक असणाऱ्या खनिज वस्तू) राखून ठेवण्यात आलेले आहेत. वरील सात उद्योग सोडल्यास कोणतेही इतर औद्योगिक क्षेत्र सरकारसाठी राखीव नाही, म्हणजे वरील सात उद्योग सोडून इतर कोणत्याही उद्योगांत खासगी उद्योजक (म्हणजे खासगी औद्योगिक क्षेत्र) प्रवेश करू शकतात. सन 1956 मधील प्रत्येक महत्त्वाचे उद्योग सरकारच्या अधिकारात असावेत (Commanding Heights) , ही भूमिका सन 1991 च्या औद्योगिक धोरणात सोडून देण्यात आली आहे. याचाच अर्थ, सार्वजनिक क्षेत्राकडून अपेक्षिलेल्या गोष्टी पूर्ण होऊ शकल्या नाहीत, याची अप्रत्यक्ष कबुली सन 1991 च्या औद्योगिक धोरणात आढळते. सरकारच्या अधीन असलेले औद्योगिक क्षेत्र विस्तारणे किंवा खासगी उद्योगांचे राष्ट्रीयीकरण घडवून आणणे या गोष्टीत सरकारला काहीही स्वारस्य उरलेले नाही.

याही पुढे जाऊन सरकारी क्षेत्रात असलेल्या कारखान्यांचे भागभांडवल त्या-त्या कारखान्यातील श्रमिक, वित्तीय संस्था व खासगी गुंतवणूकदार यांना विकून, अशा कारखान्यांत दीर्घकाळ अडकून पडलेली प्रचंड सरकारी गुंतवणूक मोकळी करण्यावर भर देण्यात येत आहे. सन 1991 च्या औद्योगिक धोरणात वरील सूचना आढळते. सन 1956 च्या औद्योगिक धोरणात घडवून आणलेला हा मूलभूत बदल होय. पंडित नेहरूंची 'मिश्र अर्थव्यवस्था' आम्ही सोडलेली नाही असे म्हणत-म्हणतच सार्वजनिक औद्योगिक क्षेत्राचा अधिकाधिक संकोच केला जात आहे. सार्वजनिक उद्योगांनी आजपर्यंतच्या त्यांच्या अत्यंत अकार्यक्षम कार्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था धोक्यात आणलेली आहे, याची अप्रत्यक्ष कबुली सन 1991 च्या औद्योगिक धोरणात दिसून येते.

**(2) परवाना पद्धतीसंबंधी** : सन 1951 मध्ये 'औद्योगिक विकास व नियमन कायदा' पास करण्यात आला. त्याद्वारे कोणते उद्योग काढावेत, त्यांची स्थापना कोठे करावी, कारखान्याने किती उत्पादन करावे, कारखाना हलवावयाचा झाल्यास कोणत्या ठिकाणी हलवावा इत्यादी सर्व बाबतीत निर्णय घेण्याचे अधिकार नोकरशाहीच्या हाती देण्यात आले होते. या कायद्याखाली औद्योगिक परवाना मिळवावयाचा म्हणजे एक दिव्यच होते. वरील कायद्याने औद्योगिक कारखाना स्थापणे व तो चालविणे हे अत्यंत त्रासदायक व कायद्याच्या बाजूने अत्यंत गुंतागुंतीचे होऊन बसले होते व त्या कायद्यामुळे लाचलुचपतीस प्रचंड वाव मिळत होता.

सन 1991 च्या औद्योगिक धोरणानुसार जी 18 उद्योगांची यादी करण्यात आली आहे ते उद्योग सोडून इतर उद्योगांना त्यांची कितीही भांडवल गुंतवणूक असली तरी औद्योगिक परवानगी घ्यावी लागणार नाही. कारखाना कोठे स्थापावयाचा हे उद्योजकाने ठरवावयाचे आहे, एकच अट आहे व ती अशी की, दहा लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांपासून असे कारखाने निदान 25 किलोमीटरपेक्षा दूर असले पाहिजेत. याचाच अर्थ, अत्यंत जाचक अशी औद्योगिक परवाना पद्धती बहुतेक उद्योगांच्या बाबतीत रद्द करण्यात आली आहे. याचाच अर्थ, यापुढे सरकारदरबारी वर्षानुवर्षे खेटे न घालता उद्योजक आपले औद्योगिक निर्णय फक्त आर्थिक व व्यावसायिक निकषावर घेऊ शकतील.

**(3) परकीय भांडवलाची गुंतवणूक** : भारताची सध्याची परकीय चलनाबाबतची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. अशा परिस्थितीत भारताला परकीय भांडवलाची देशात जास्तीत जास्त गुंतवणूक हवी आहे. या कारणामुळे सन 1991 च्या औद्योगिक धोरणाने भारतातील काही उद्योगांमध्ये 51 टक्के परकीय भांडवल गुंतवणुकीस परवाना देण्याचे

केलेली आहे. अशा सुमारे 34 उद्योगांची यादी सन 1991 च्या धोरणात देण्यात आलेली असून कोणताही सरकारी परवाना न घेता त्या उद्योगांत 51 टक्के परकीय भागभांडवल गुंतविता येणार आहे. या भागभांडवलातून परदेशी यंत्रसामग्रीची आयात करावयाची असल्यास त्यासाठी कोणतीही परवानगी आवश्यक नाही किंवा आयात परवान्याची गरज नाही.

सन 1991 च्या औद्योगिक धोरणातील आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे भारताची निर्यात वाढविण्यासाठी परकीय व्यापारी कंपन्यांनी भारतात गुंतवणूक करावी म्हणून सरकार विशेष प्रयत्न करणार आहे.

(4) **परकीय तंत्रज्ञानासंबंधी :** भारतात परदेशातून आधुनिक तंत्रज्ञान यावे म्हणून परकीय तंत्रज्ञानाची आयात करण्यासाठी आवश्यक ते करार करण्यासाठी मुक्त हस्ताने परवानगी देण्याचे सरकारने ठरविले आहे. अशा करारामुळे भारताच्या परकीय चलनाच्या परिस्थितीवर काहीही बोजा पडणार नाही. त्याचप्रमाणे ज्या करारान्वये निर्यात करून परकीय चलन मिळविण्याची तरतूद असेल अशा करारांना सरकारकडे न जाता त्यांची परवानगी गृहीत धरून आपली व्यवस्था करता येईल. अशाच व्यवस्थेखाली परकीय तंत्रज्ञांची नेमणूक करावयास किंवा संशोधन किंवा विकासासाठी नवे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी मुक्त परवाने दिले जातील.

वरील बाबतीतील सर्व निर्णय खासगी क्षेत्रातील उद्योजकांनी घ्यावयाचे आहेत. त्यात सरकार हस्तक्षेप करणार नाही.

(5) **मक्तेदारी कायद्यात सुधारणा :** सन 1991 च्या औद्योगिक धोरणातील आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे मक्तेदारी नियमन कायद्यात करण्यात आलेली दुरुस्ती.

मक्तेदारी कायद्यानुसार सन 1991 चे धोरण जाहीर होण्याआधी ₹ 100 कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक असणाऱ्या कंपन्यांना मक्तेदारी कायदा लागू होता व त्यानुसार अशा कारखान्यांचे नवीन उत्पादन, उत्पादनात वाढ, कंपन्यांचा विस्तार इत्यादी बाबींवर मक्तेदारी आयोगाचे बरेच नियंत्रण होते.

सन 1991 च्या औद्योगिक धोरणानुसार भांडवलाची कमाल मर्यादा काढून टाकण्यात आलेली आहे. यापुढे भांडवलाच्या गुंतवणुकीच्या आधारे एखाद्या कंपनीस मक्तेदारी कंपनी असे ठरविण्यात येणार नसून ज्या कंपनीचे उत्पादन संबंधित उद्योगाच्या एकूण उत्पादनाच्या 25 टक्क्यांपेक्षा जास्त असेल अशीच कंपनी मक्तेदारी कंपनी ठरेल औद्योगिक धोरणात असेही म्हटले आहे की, यापुढे मक्तेदारी आयोगाने व्यापारावरील निर्बंधावर भर द्यावा व भारतात निकोप व मुक्त स्पर्धा होईल याकडे आपले लक्ष पुरवावे.

मक्तेदारी कायद्यातील हाही बदल महत्त्वाचा आहे. या बदलामुळे मोठ्या उद्योगसमूहावर असलेली बंधने व निर्बंध दूर होणार आहेत व त्यांना नवीन कारखाने, नवीन उत्पादन वगैरे हाती घेणे सोपे होणार आहे.

## सन 1991 च्या धोरणातील बाबी

यंत्रसामग्रीच्या किमान 25 टक्के किंवा दोन कोटी रुपयांपर्यंतचे आयात परवाने नव्या कंपन्यांना आपली यंत्रसामग्री आयात करण्यासाठी आपोआप मिळतील असे या धोरणात म्हटले जाते.

वित्तीय संस्था आपले उद्योगांना दिलेले कर्ज भागभांडवलात रूपांतर करण्याची जी पूर्वीची अट होती ती अट संपूर्णपणे रद्द करण्यात आली आहे.

सार्वजनिक वित्तीय संस्थांकडून कर्ज काढताना खासगी क्षेत्रातील कंपन्यांच्या मनात आता संशयास जागा उरणार नाही.

अधिक भांडवल न गुंतविता उपलब्ध यंत्रसामग्रीच्या साहाय्याने त्याच उद्योगातील दुसऱ्या कोणत्याही वस्तूंचे उत्पादन करता येईल. याबाबतची परवाना पद्धती रद्द करण्यात आली असून उद्योजकाने आपण कोणत्या नव्या वस्तूंचे उत्पादन करणार आहोत याची फक्त सरकारकडे नोंद करावयाची आहे.

## सन 1991 च्या औद्योगिक धोरणाचे अपेक्षित फायदे

(1) सन 1951 ते 1991 पर्यंत भारतातील औद्योगिक क्षेत्र परवाना पद्धती, दिरंगाई, कायद्याचे नियम व उपनियम, ... प्रचंड प्रमाणावरील लाचलुचपत या सर्वांत पूर्णपणे अडकून पडले होते व